शुक्रवार, १७ फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१७४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 17 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-174 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# ३० हजार शिक्षकांची भरती करणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची घोषणा; जुन्या पेन्शन योजनेवर काम सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**सिंधुदुर्ग : राज्यात लवकरच ३० हजार शिक्षकांची भरती केली जाणार आहे. त्याशिवाय जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न सुरु आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या त्रैवार्षिक अधिवेशनाला एकनाथ शिंदे यांनी आज उपस्थिती दर्शवली होती. यावेळी त्यांनी शिक्षकांशी संवाद साधला.**



ते पुढे म्हणाले की, गेल्या सहा महिन्यांत शासनाने शिक्षण विभागाला दिलासा देणारे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत, त्याचे आम्हाला समाधान वाटते. शिक्षकांनी शिक्षण देण्याचे उदात्त कार्य मोकळेपणाने करावे. शासन त्यांच्यावर कोणतेही बंधन टाकणार नाही. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार राज्य शासनाने राज्यातील मुला-मुलींना समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. राज्यात शिक्षकांची ३० हजार पदे शासन भरत असून लवकरच पदभरती केली जाईल, असे एकनाथ शिंदे यांनी या अधिवेशनात सांगितले. शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन सकारात्मक असून जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न सोडवण्यासाठी देखील शिक्षण विभाग काम करत आहे. हा प्रश्न टप्पाटप्प्याने सोडवता येईल का, याचा देखील विचार सुरू असून त्यासाठी लागणारा वेळ शिक्षकांनी शासनाला द्यावा अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली, असे एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ आणि समिती या दोन शिक्षक संघटनांचे अधिवेशन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे सुरू आहे. 15 ते 17 फेब्रुवारी दरम्यान हे अधिवेशन चालणार आहे. 18 तारखेला महाशिवरात्री आणि 19 तारखेला रविवार असल्याने विद्यार्थांना सलग 5 दिवस सुट्टी असणार आहे.

### महत्वाची बातमी

# कर्ज मंजूर करताना वसुली एजंटची सर्व माहिती कर्जदाराला द्या : आरबीआय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने डिजिटल कर्ज देणाऱ्या कंपन्यांबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. डिजिटल कर्ज देणाऱ्या बँकांकडून कर्जवसुली करण्यासाठी जे वसुली एजंट नेमले जातील, त्यांची संपूर्ण माहिती कर्जदाराला देण्याचे निर्देश आरबीआयने दिले आहेत. कर्जवसुली संबधित वसुली एजंट्सच्या अनेक तक्रारी आल्यानंतर आरबीआयने हे पाऊल उचलले आहे. आरबीआयने डिजिटल कर्जासंबंधिच्या मार्गदर्शक तत्त्वांबाबत FAQ जारी केला आहे. त्यामध्ये आरबीआयने म्हटले आहे की, कर्ज थकीत झाल्यास आणि कर्जदाराकडून वसूल करण्यासाठी रिकव्हरी एजंटची नियुक्ती केली असल्यास, डिजिटल कर्ज देणाऱ्या कंपन्यांनी वसुली एजंटशी संपर्क साधण्याआधी त्यांचा फोन नंबरपासून सर्व माहिती द्यावी. वसुली एजंटची सर्व माहिती ही ईमेल आणि एसएसएसद्वारे दिली जावी. आरबीआयने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये म्हटले आहे की, कर्ज मंजूर करताना, डिजिटल कर्ज देणाऱ्या कंपन्या पॅनेलवर नियुक्त केलेल्या अधिकृत वसुली एजंटचे नाव कर्जदारांना देतील.

# शिर्डीत नाईट लँडिंगची परवानगी

## फडणवीसांनी मानले मोदी, ज्योतिरादित्य शिंदेंचे आभार

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** शिर्डीत दर्शनाला जाणाऱ्या साईभक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर आता शिर्डीत नाईट लँडिंगची सुविधा प्राप्त झाली आहे. गुरुवारी सकाळीच डीजीसीएकडून याबाबतचा परवाना प्राप्त झाला आहे. उपमुख्यमंत्र्यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नागरी उड्डयन मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे आभार मानले आहेत.

शिर्डीसाठी ही गेल्या दोन महिन्यांतील तिसरी आनंदाची बातमी आहे. नागपूर ते शिर्डी हा समृद्धी महामार्ग मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खुला झाला. त्यापाठोपाठ मुंबई ते शिर्डी अशी वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाली आणि आता नाईट लँडिंगची सवलत प्राप्त झाल्याने पहाटेच्या काकडआरतीला उपस्थित राहू इच्छिणाऱ्यांना रात्री प्रवास करुन येता येणार आहे. एकूणच भाविकांना मोठ्या सुविधा यामुळे निर्माण होणार आहेत. गेल्या काही कालखंडापासून यासाठी प्रशासकीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा होत होता. अखेर देवेंद्र फडणवीस यांनी ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे तातडीने हा परवाना देण्याबाबत आग्रह धरला आणि आज सकाळी डीजीसीएकडून हा परवाना प्राप्त झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात महाराष्ट्राने आणखी एक भर विकासात घातली आहे. शिर्डी विमानतळ देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात 2017 मध्ये सुरु झाले होते.

यामुळे शिर्डी यात्रा तर सुलभ होईलच. शिवाय, या परिसराच्या विकासाला सुद्धा गती प्राप्त होणार आहे. भाविकांच्या संख्येत सुद्धा मोठी वाढ यामुळे अपेक्षित असून, त्यामुळे स्थानिक अर्थकारणाला गती प्राप्त होईल. उर्वरित प्रक्रिया पूर्ण करुन, विमानांचे उन्हाळी वेळापत्रक लागू होईल, तेव्हा साधारणतः मार्च/एप्रिलपासून आता रात्रीचीही विमानसेवा यामुळे आता प्रारंभ होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सध्या शिर्डीला 13 विमानसेवा आहेत.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## स्वामी कृपा

अहमदनगर जिल्ह्यातील खेडगाव हे एक छोटंसं गाव. या गावात शेतकरी, शेतमजुरी करणारी बहुतेक कुटुंबे गुण्यागो विंदाने नांदत होती. अशा कुटुंबांपैकी एक होतं देशमुख कुटुंब. या कुटूंबात आईवडील, एक मुलगा, एक मुलगी आणि आजी आजोबा असे सहा जण. वडील साहेबराव तलाठी म्हणून काम करीत. आई गृहिणी होती. मोठी मुलगी रेश्मा आणि तिच्यापेक्षा लहान असलेला राहुल. नाही म्हणायला देशमुख कुटुंबीयांची थोडीशी शेती होती, पण त्यातून फारसे उत्पन्न हाती लागत नव्हते. पण अशा सामान्य परिस्थितीतही देशमुख कुटुंबीयांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून खूप प्रयत्न केले होते. त्यांना शिक्षणासाठी पैसे कमी पडू नयेत म्हणून आई घरखर्चात काटकसर करून पैसे वाचवायची. वडीलही बाहेरची दोन कामे जास्त कामे करून दोन पैसे अधिक मिळावेत म्हणून धडपडत असत. देशमुख कुटुंबीयांची परिस्थिती सामान्य असली तरी संस्काराची श्रीमंती मोठी होती. आपल्या कष्टाच्या कमाईचाच पैसा घरात यावा यासाठी साहेबराव दक्ष असत. घरातले वातावरण धार्मिक होते. रेश्माच्या आईची स्वामी समर्थांवर अपार श्रद्धा होती. रेश्माच्या आईने रेश्माला अभ्यासासोबतच घरकाम आणि स्वयंपाकातही तयार केले होते. कधी कधी आई जर माहेरी गेली, तर रेश्मा तिची उणीव भासू द्यायची नाही. ती उत्तम स्वयंपाक करून सगळ्यांना जेवू घालायची. तिच्या हाताला कमालीची चव होती. रेश्मा आणि राहुल दोघं भावंडं अभ्यासात हुशार होती. त्यांचा शाळेत नेहमी पहिल्या पाचात नंबर असायचा. रेश्मा बारावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली.





## आनंदी पहाट

### बालमन अनुकरणप्रिय असल्याचे विसरू नये

आधुनिक केसरी

प्रत्येक घडामोडींचा थेट परिणाम बालमनावर होत असतो. बालमन निष्पाप असतं, त्या मनाला खरं-खोटं, चांगलं-वाईट, आपलं-परकं, जवळचा-लांबचा ह्यांतील फरक समजण्याइतकं ते परिपक्व झालेलं नसतं. नात्यांत दुरावा निर्माण होण्यास कोण जबाबदार आहे ? यापेक्षा काय कारणीभूत आहे याचा विचारपूर्वक शोध घेणं जरुरीचं असतं. निर्माण होणारी परिस्थिती ही केवळ मानसिक कारणांमुळेच अधिक असते. आपापल्या मनाच्या मर्यादा लक्षात न घेतल्याने अनेक प्रसंग निर्माण होतात. ह्या प्रतिकूल परिस्थितीत कोण चुकत आहे ? ह्यावर भर दिला जातो आणि नेमकं कारण काय असू शकतं ? की ज्यामुळे परिस्थितीतील अनुकुलता संपुष्टात आली, ह्याची जाणीव होत नाही. बालमन अत्यंत निरागस असतं, हे आपल्याकडून केवळ बोललं जातं; पण त्याचा अनेकदा आपल्या विचारांत आणि वर्तनांत उपयोग केल्याचं दिसून येत नाही. बालमन हे अनुकरणप्रिय असतं; निरपेक्ष, निरागस, निःस्वार्थी आणि निरपराधी असतं. केवळ अनुकरणप्रिय पिंडानुसार ते सभोतली घडणाऱ्या घटना, घडामोडी याचं निरीक्षण करून त्याचं अनुकरण करत असतं. ह्या



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

बालमनाला सकारात्मक वातारणात वाढवणे आवश्यक असतं. ज्यायोगे घडणाऱ्या घडामोडी ह्यादेखील सकारात्मकच असल्याची प्रचीती येत राहते. लहान मुलांना निश्चितच तळहातावरील फोडासारखं वाढवायचं असतं. त्याच अनुषंगानं त्यांचं संगोपन, पालनपोषण करायचं असतं. अनेकदा लहान मुलं मोठी कधी झाली कळलंच नाही असं कौतुकानं सांगितलं जातं. लहानपणी आवश्यक असलेली औषधे आणि उपचार देताना आपलं अपत्य हे आपत्ती नाही ह्याची सतत जाणीव राहण्याची जरुरी असते. व्यक्ती तितक्या प्रकृती, ह्या उक्तीप्रमाणे आणि निसर्ग नियमानुसार प्रत्येक बाळाची शारीरिक जडणघडण भिन्न असते.



आधुनिक केसरी

**माय इंद्रायणी | सुखी झाली ||**
नदीच्या किनारी | विठुचे मंदिर ||
मांगल्याचे सूर | अभंगात ||१||
विण्या मध्ये हरि | गुंजन करतो ||
भजनी रमतो | लेकुरवाळा ||२||
हाती घेता टाळ | विकार जळतो ||
संसार फुलतो | तुझ्या कृपे ||३||
तुझ्या नामे आता | घालीन जागर ||
नामाचा गजर | निरंतर ||४||
खळाळु दे नदी | चंद्रसभागे वानी ||
माय इंद्रायणी | सुखी झाली ||५|



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


**तुझ्यात अफाट शक्ती आहे. तिला एका दिशेची आणि ध्येयाची गरज आहे. वाटलं तर कोणाची तरी मदत घे. वाटलं तर कोणाचीही मदत घेऊ नकोस. पण त्या तुझे ठायी असलेल्या शक्तीला दिशा आणि ध्येय अवश्य दे. त्याशिवाय जीवनाचा खरा आनंद तुला मिळणार नाही.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मना मनन जब तक रहे, तब तक भजन न जान ।**
**अमन अगम अनुभव चले, सत्य भजन परमान ।।५३।। (स्वर्वेद प्रथम मण्डल तृतीय अध्याय) ०१/०३/५३**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
जोपर्यंत मनात संसार-विषयांचे मनन, चिंतन, इच्छा, वासना असते, तोपर्यंत भक्ती होत नाही. मनाच्या अभावात , जिथे मनाची गती पोहोचू शकत नाही त्या चेतन आत्म विकासाने परब्रह्माचा अनुभव होतो. हाच वास्तविक सत्य भक्तीचा आदर्श आहे अर्थात यालाच खरी परमेश्वराची खरी उपासना म्हणतात. म्हणून मन असता भक्ती होत नाही. मनाचा निरोध करून त्याचा लय आणि त्याला शांत केल्यानंतरच चेतन आत्मा, चेतन साधनेने चेतन परब्रह्माची प्राप्ति करतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

गीता, भागवत, रामायण, महाभारत अशा अनेक ग्रंथात आपल्याला उपदेश मिळतो. पण जगात देहबुद्धीच्या पलीकडे पहाणारा जो असतो त्याला या सर्व गोष्टी समजतील . पण देहबुच्या चौकटीत अडकणारा खोट्याचे खरे व ख-याचे खोटे करून दाखवतो. तो धड प्रपंच करू देत नाही किंवा परमार्थ चालू देत नाही. परमानंद मिळवण्यासाठी मी पणा सोडून द्यावा. परमात्म स्वरूपाशी एकरूप व्हावे. मी पणाचे भयंकर परिणाम परमानंद मिळत नाही. ब्रम्हवस्तूंचा आत्मसाक्षात्कार होत नाही. मी पणा जडला की भगवंत भक्ति कमी कमी होत जाते. मी पणाने वैराग्याचा शक्तिपात होतो. वैराग्य ही मनाची निरासक्त अवस्था आहे. मी पणाने वासना निर्माण होऊन जीव द्रुष्य पदार्थाना मनाने जोडला जातो. जगातील कुणाची ही मला गरज नाही, बंधन स्वातंत्र्य धुडकावून लावल्यमुळे जीवाला जडत्व येते. मग ब्रम्ह समजेनासे होते. परमार्थात काय करावे काय करू नये हे समजत नाही गर्व, अहंकार ताठा, यश, कीर्ति, प्रताप यासर्व गोष्टीमी पणाने नाहिशा होतात. मी पणाने मित्रामित्रातील स्नेह नाहींसा होतो. आप आपसातील प्रेम,जिव्हाळा कमी होतो. मी पणाने माणसाच्या अंगी अभिमान चिकटतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भगवंताच्या नामानेच वासनाक्षय

आधुनिक केसरी

आपण सर्व जीव वासनेत गुंतलेले आहोत, कारण आपला जन्मच वासनेत आहे. वासना म्हणजे, ‘आहे ते असू द्याच, आणि आणखीही मिळू द्या’ असे वाटणे. आपण सध्या या स्थितीत आहोत. पण सुरुवात म्हणून आपण असे म्हणावे की, ‘आहे ते असू द्या, आणि आणखी मागायचे ते परमेश्वराजवळ मागू या.’ म्हणजे, मिळाले तर ‘भगवंताने दिले’, आणि न मिळाले तर ‘त्याची इच्छा नाही’, अशी जाणीव होऊन ‘दाता परमात्मा आहे’ ही भावना वाढू लागेल; आहे तेही त्याच्याच इच्छेचे फळ आहे असे वाटू लागून अस्वस्थता आणि आसक्ती कमी होऊ लागेल; आणि आसक्ती कमी होऊ लागली की, ‘हवे-नको’ कमी होऊन वासना ओसरू लागेल. केवळ आपल्या कर्तबगारीने वासनेच्या पलीकडे जाणे अशक्य आहे; त्याला शरणागतीशिवाय गत्यंतर नाही. याकरिता योग्य संगतीचाही फार उपयोग होईल. एखाद्या बैराग्याची संगती केली तर स्वाभाविकच कपड्याचे प्रेम कमी होईल, पण एखाद्या शेटजीच्या संगतीत राहिलो तर छानछोकी करण्याकडे प्रवृत्ती होईल. म्हणून अशा संगतीत राहावे की, ज्यामुळे शरणागती यायला मदत होईल.

शरणागती म्हणजे परमेश्वराला सर्वस्वी अर्पण होऊन राहणे; याचाच अर्थ, आपण उपाधिरहित बनणे. तर मग आपण अशाच साधनाची संगती केली पाहिजे, की जे अत्यंत



उपाधिरहित आहे. हे साधन म्हणजे भगवंताचे नाम. काळ, वेळ, परिस्थिती, उच्चनीच भाव, स्त्री-पुरुष, विद्वता-अडाणीपणा, श्रीमंती-गरिबी, प्रकृतीची सुस्थिती-दुःस्थिती वगैरे कोणतीही गोष्ट नामाला आड येऊ शकत नाही. तसेच, त्याला कोणतीही उपकरणे लागत नाहीत. ते हृदयात सतत आपल्याबरोबर बाळगता येते. नामात वैराग्याचे कष्ट नाहीत, आणि कुठेही, केव्हाही ते बरोबर नेता येते. त्यासाठी विषयाची तदाकारवृत्ती सोडली पाहिजे. ‘भगवंत माझ्या मागे आहे’ अशी श्रद्धा राखली की वृत्ती विषयाशी तदाकार होत नाही. मारुतीने दिलेली मुद्रिका पाहिल्यावर सीतेला रामाच्या स्वरूपाची आठवण झाली, त्याप्रमाणे नाम घेताना आपल्याला त्याची आठवण झाली पाहिजे. भगवंताच्या अनुसंधानात जो राहिला त्याने काळावर सत्ता गाजविली. अशा लोकांना मरणाचे भय कुठून असणार ? भगवंताला सर्वस्व दिल्यामुळे त्यांना वासना उरत नाही; आणि जिथे वासना उरली नाही तिथे काळाचा शिरकाव होत नाही. वासना नष्ट होणे म्हणजे देहबुद्धी नष्ट होणे होय. वासनेच्या क्षयामध्ये आपलेपणाचे मरण आहे, आणि हे मरण डोळ्यांनी पाहण्यासाठी आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे.
**आजचे बोधवचन आहे - वासनेचा क्षय भगवंताच नामात आहे हे अक्षरशः खरे आहे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ।।ध्रु.।।**
**वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता जाला ।।२।।**
**आठव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कौतुकें ।।३।।**
**हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ।।१।।**
**तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ।।ध्रु.।।**





## छत्रपती शिवाजी महाराज आणि बेगडी शिवप्रेम

आधुनिक केसरी

महापुरुषांना व्यवस्थितपणे वाचून त्यांच्या जीवनाचे विवेकपूर्ण-अभ्यासपूर्ण-तटस्थ विश्लेषण झाले पाहिजे. केवळ धर्म-रंग-जात-वर्ण-भावना आदी चष्म्यातून महापुरुषांचे अवलोकन झाल्यास त्यांचा खरा इतिहास झाकोळलेलाच राहण्याची भीती आहे. त्यासाठी वर्तमानातील तमाम उच्च शिक्षित मंडळींनी सातत्याने वाचन-चिंतन करून लोकांसमोर हे महापुरुष आणावे लागतील. अशा दहा लेखांनी आणि माझ्यासारख्या केवळ एका व्यक्तीने हे शिवधनुष्य पेलणे दुरापास्त आहे. मागील सात भागात छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या संबंधाने विविध विषयांवर विश्लेषण करतांना अनेक तरुण, अभ्यासू, लेखक, प्रकाशक आदि मंडळींचे बोलणे अथवा मिडियावर संवाद झाले. अनेकांनी लिहित्या हातांना बळ दिले. हे श्रेय विविध वर्तमानपत्रांचे संपादक-सहसंपादक यांना जाते. काही मित्रांनी लेख वाचण्यासाठी मुद्दाम मागवून घेतले. काहींनी यावर पुस्तक काढण्याची सूचना केली. हे सर्व पाहून-ऐकून आपण लिहिण्याचा योग्य निर्णय होता याचे समाधान झाले. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या असून काही लोक वाचत आहेत याचा मनस्वी आनंद झाला,




परंतु तरुणांनी वाचून प्रतीक्रिया दिल्या नाहीत. हे सदर लिहिण्याचे लक्ष तरुण, वाईट सवयींनी ग्रस्त आणि जात-धर्म आदींच्या कट्टर आवेशाने झपाटलेल्या लोकांना छत्रपती शिवराय सांगणे हा असला तरी उच्च शिक्षित लोकांनी आपली मरगळ झटकून या कामाला लागावे यासाठी आहे, आणि तो सातत्याने असणार आहे. आज मिडियाने फार मोठे बदल घडवून आणलेत. त्यातील बरेच बदल मानवासाठी निश्चितच हिताचे नाहीत. प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया आणि आता न्यू मिडीयाने हाहाकार माजवला आहे. न्यू मिडीयाने झपाट्याने क्रांती घडवून मागील ८०० वर्षांत जे झाले नाही ते बदल या २० वर्षात झाले. प्रचंड सामाजिक बदल घडून आले. दुर्दैवाने सामाजिक मूल्ये बदलायला नको होती, परंतु ती सुद्धा बदलली. माणसे आधुनिक कपडे घालून पारंपारिक विचार जपत आहेत. त्यातल्या त्यात OTT प्लॅटफॉर्मने तर कहरच केलाय. सगळीकडे अनियंत्रित पिढी निर्माण झाली आहे. लोक वेड्यासारखे केवळफॉरवर्डरोगाने ग्रस्त आहेत. चिंतन, वाचन, लेखन, मनन, संवाद बंद झाले आहे. ही मोठी भयंकर बाब आहे! आज महापुरुषांच्या चरित्र-विचारांची समाजाला नितांत गरज असतांना केवळ हातात महागडा मोबाईल, भारीचे कपडे, तोंडात तंबाखू-गुटखा टाकून छत्रपती शिवाजी महाराजांचे अनुयायी नाही होता येणार! प्रौढ लोक सुद्धा बेताल वागायला-बोलायला लागलेत. जातीय कट्टरतेचे भूत लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवते आहे. हे थांबणे गरजेचे आहे. स्वतंत्र विचार करून आणि महापुरुष वाचून त्यांचे अवलोकन-अवलंबन करायला हवे. यात आता नारी शक्तीने सहभागी व्हायला हवे. उच्च शिक्षित मुली आणि महिलांनी समाजसुधारणेची धुरा स्वतःच्या खांद्यावर घ्यायची वेळ आली आहे. जिजाऊ आईसाहेब, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, रमामाई आंबेडकर यांचा वसा-वारसा चालवताना आपल्या भोवताल बिघडत चाललेल्या पिढीला वाचवायला हवे. महापुरुष हे नाचून नाही तर वाचून घ्यावे लागतील! केवळ घोषणा, मिरवणुकीने, हवेत झेंडे आणि पेहराव करून शिवजयंती साजरी होणार नाही. राज्यकर्त्या लोकांनी आपले काम व्यवस्थितपणे समजून घ्यावे आणि त्याचा योग्य प्रसार-प्रचार करावा. असे झाल्यास महापुरुषांच्या जयंती-पुण्यातीथीचे कार्यक्रम सर्वसमावेशक होतील. तेंव्हा, माझी तमाम शिवप्रेमी मंडळींना कळकळीची विनंती आहे की, कृपया, दारू पिऊन महापुरुषांची जयंती साजरी करू नका! व्यसनांचा त्याग करा. तरुणांनी मोबाईलवर गेम खेळण्याऐवजी मैदानात उतरून खेळ खेळावेत. मन-मस्तक-शरीर बलदंड करावे आणि मगच महाराजांच्या जयंतीचे शिलेदार व्हावे! असे झाल्यास निश्चितच घराघरातील आई-वडील सुखावतील! घरात संवाद प्रस्थापित होण्यासाठी सकाळ-संध्याकाळ काहीतास मोबाईलपासून दूर राहून सामूहिक प्रार्थना आणि आपापल्या घरीच एकवेळचे सामुहिक भोजन करावे, जेणेकरून कौटुंबिक एकोप्याची, प्रेम-जिव्हाळा-आपुलकीची भावना मनामनात रुजायला लागेल! संवाद सुरु होतील! जेवण करतांना टीव्ही-मोबाईल बंद असेल. असे झाल्यास घरात नवचैतन्य येईल! छत्रपती शिवाजी महाराजांचे अस्तित्व घराघरात जाणवायला लागेल, बेगडीपणा गळून पडेल आणि घरोघर खरी शिवजयंती साजरी होईल! जय हिंद! जय शिवराय!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068


## दक्षिण आफ्रिकेतून १२ चित्ते भारतात येणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सहा महिन्यांपूर्वी नामिबियातून आणलेले आठ चित्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मध्य प्रदेशातील कुनो अभयारण्यात सोडण्यात आले होते. त्यानंतर आता दक्षिण आफ्रिकेतून आणखी १२ चित्ते शनिवार १८ फेब्रुवारी रोजी भारतात आणले जाणार आहेत. अशाप्रकारे दक्षिण आफ्रिकेतून चित्त्यांची दुसरी तुकडी भारतात दाखल होणार आहे. दक्षिण आफ्रिकी चित्त्यांची दुसरी तुकडी ग्वाल्हेर येथे हवाईमार्गे आणण्यात येईल. त्यानंतर त्यांना कुनो येथे आणले जाईल. दक्षिण आफ्रिकेतून येणाऱ्या चित्त्यांच्या दुसऱ्या तुकडीमध्ये ७ नर आणि ५ मादी चित्त्यांचा समावेश असणार आहे. केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांनी याबाबत माहिती दिली आहे.



गुरुवार भारती हवाई दलाच्या C17 विमानाने ज्यास ग्लोब मास्टर म्हणूनही ओळखले जाते, सकाळी ६ वाजता हिंडन विमानतळावरून उड्डाण केले. हे विमान आज सायंकाळीच जोहान्सबर्गच्या O.R टॅम्बो विमानतळावर उतरेल आणि उद्या (शुक्रवार) संध्याकाळी १२ चित्त्यांसह उड्डाण करणे अपेक्षित आहे. निवडलेले चित्ते क्वाझुलु नताल येथील फिंडा गेम रिझर्व्ह (२ नर, १ मादी) आणि लिम्पोपो प्रांतातील रुईबर्ग गेम रिझर्व्ह(५ नर, ४ मादी) येथू येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ सप्टेंबर २०२२ रोजी आपल्या ७२ व्या वाढदिवशी नामिबियातून आणलेल्या पाच मादी आणि तीन नर अशा आठ चित्त्यांची पहिली तुकडी कुनो राष्ट्रीय उद्यानात सोडली होती. हे चित्ते अभयारण्याच्या विस्तीर्ण परंतु बंदिस्त भागात शिकार करत आहेत.




## सीतारमन यांचे संकेत

आधुनिक केसरी

पेट्रोल आणि डिझेलचे दर गगनाला भिडले आहेत. गेल्या काही दिवसांपासून देशातील पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर असल्या तरी उच्च पातळीवर पोहोचलेल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी केंद्र सरकारनं पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्कात घट करत पेट्रोल-डिझेलच्या किमतींत घट केली होती. तेव्हापासूनच देशातील दर स्थिर आहेत. असं असूनदेखील देशातील महानगरांसह अनेक शहरांमध्ये एक लिटर पेट्रोलचा दर 100 रुपयांहून अधिक आहे. अशातच आता पेट्रोल-डिझेलच्या किमती कमी करण्यासंदर्भात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मोठे संकेत दिले आहेत. राज्य सरकारे आणि जीएसटी कौन्सिलही सहमत असेल तर पेट्रोलियम उत्पादनं जीएसटीच्या कक्षेत आणता येतील, असं अर्थमंत्री म्हणाल्या आहेत. आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सरकारचा गेल्या काही वर्षांपासून पब्लिक एक्सपेंडीचरमध्ये (सार्वजनिक भांडवली खर्च) वाढ करण्याचा प्रयत्न आहे. पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री या उद्योग संस्थेच्या सदस्यांसोबत अर्थसंकल्पानंतरच्या बैठकीत बोलताना अर्थमंत्र्यांनी हे वक्तव्य केले आहे. यावेळी अर्थमंत्री म्हणाल्या की, पेट्रोलियम उत्पादने जीएसटीच्या कक्षेत आणण्याची तरतूद आधीपासूनच आहे. माझ्याआधीच्या अर्थमंत्र्यांनीही याबाबतचा पर्याय खुला ठेवला आहे. दरम्यान, सध्या पाच पेट्रोलियम उत्पादने कच्चे तेल, पेट्रोल, हायस्पीड डिझेल, नैसर्गिक वायू आणि विमान इंधन जीएसटीच्या बाहेर आहेत. अर्थमंत्र्यांच्या या वक्तव्यानंतर आता जीएसटी कौन्सिल काय निर्णय घेणार? हे पाहणे महत्त्वाचं ठरणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण बोलताना म्हणाल्या की, राज्यांनी सहमती दिल्यानंतर आम्ही पेट्रोलियम पदार्थ जीएसटीच्या कक्षेत आणू. दरम्यान, पेट्रोलियम पदार्थांना जीएसटीच्या कक्षेत आणलं तर पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील. जीएसटी परिषदेची पुढील बैठक 18 फेब्रुवारी 2023 रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे. अर्थमंत्र्यांनी असंही सांगितलं की, सरकारने 2023-24 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च 33 टक्क्यांनी वाढवून 10 लाख कोटी रुपये केला आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून सार्वजनिक भांडवली खर्चावर भर दिला जात आहे. या अर्थसंकल्पातही आम्ही ते कायम ठेवले आहे. या अर्थसंकल्पात भांडवली खर्चावर भर देण्यात आला आहे, असे स्पष्टपणे म्हणता येईल, असं निर्मला सीतारमण म्हणाल्या. गेल्या अनेक वर्षांत पहिल्यांदाच भांडवली खर्चानं दुहेरी आकडा गाठला आहे. यावरुन अर्थसंकल्पात एखाद्या गोष्टीला महत्त्व देण्यात आल्याचे दिसून येत आहे. ऊर्जेसह विविध क्षेत्रातील सुधारणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि 'एक देश, एक रेशन कार्ड लागू करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन दिले जात आहे, असेही अर्थमंत्री म्हणाल्या आहेत.

## इस्लाम व ख्रिश्चन धर्माबाबत प्रयोगकर्ते कोण ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**प्रस्तुत लेख हा सद्गुरुदेव रामकृष्ण परमहंस यांच्या आध्यात्मिक, तांत्रिक, वैष्णव, आणि भक्तिमय जीवनाचा परिचय करून देतो. रामकृष्ण परमहंस यांनी त्यांच्या पूर्ण जीवनात भक्ती, ज्ञान आणि धर्म प्रसार केला. सद्गुरुदेव रामकृष्णजींचा सर्व धर्मीयांसाठी उपदेश- "जतो मत, ततो पथ- जितकी मते, तितके पंथ" हा उपदेश सहिष्णुतेचे प्रतीक आहे. परमहंसांचे पुढील उद्गार प्रसिद्ध आहे- "माझा धर्म बरोबर, दुसऱ्यांचा धर्म चूक, हे मत योग्य नाही. ईश्वर एकच आहे, त्याला वेगवेगळे लोक भिन्न भिन्न नावाने पुकारतात. कोणी म्हणती गॉड, कोणी अल्ला, कोणी म्हणती कृष्ण, कोणी म्हणती शिव, कोणी म्हणती ब्रह्म. तळ्यात पाणी असते परंतु कोणी त्याला पाणी म्हणतो, कोणी वॉटर तर कोणी जल. हिंदू त्याला जल म्हणतात, ख्रिश्चन वॉटर, मुसलमान पानी म्हणतात, पण वस्तू एकच असते.**

एकेका धर्माचे एकेक मत असते, एकेक पथ असतो, परमेश्वराकडे घेऊन जाण्यासाठी. जशी नदी नाना दिशांहून येऊन एकाच सागरात विलीन होते. रामकृष्ण परमहंस- पूर्वाश्रमीचे नाव गदाधर चट्टोपाध्याय हे एकोणिसाव्या शतकातील भारतात बंगालमध्ये होऊन गेलेले जगद्विख्यात गूढवादी सत्पुरुष होते. स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंसांचे प्रमुख शिष्य होते. आधुनिक भारतीय धर्मप्रबोधनात त्यांनी कामगिरी बजावली. ते त्यांच्या शिष्यांमध्ये ईश्वराचे अवतार मानले जातात. ते ग्रामीण बंगालमधील एका गरीब वैष्णव ब्राह्मण परिवारात जन्मले. कोलकात्याच्या दक्षिणेश्वर काली मंदिरात त्यांनी काही काळ पौरोहित्य केले. त्यानंतर शाक्तपंथीयांच्या प्रभावाने काली आराधना सुरू केली. त्यांच्या आरंभीच्या काही प्रसिद्ध आध्यात्मिक गुरूंमध्ये भैरवी ब्राह्मणी या साध्वीचा समावेश होतो. तंत्र व वैष्णव भक्तीमध्ये भैरवीला गती होती. नंतर परमहंसांच्या म्हणण्यानुसार एका अद्वैत वेदान्तीच्या मार्गदर्शनाखाली त्यांना निर्विकल्प समाधी अनुभवता आली. त्यांनी इतर धर्मांबाबतही, विशेषतः इस्लाम व ख्रिश्चन धर्माबाबत प्रयोग केले आणि हे सर्व धर्म एकाच ईश्वराकडे घेऊन जातात, असे म्हटले. ग्रामीण बंगाली भाषेतील छोट्या छोट्या कथांचा तेथील जनतेवर बराच प्रभाव पडला. त्यामुळे रूढार्थाने अशिक्षित असतानाही रामकृष्ण परमहंस हे बंगाली विद्‌बज्जन समाजाचे व शिक्षित मध्यमवर्गाचे लक्ष वेधण्यास यशस्वी ठरले. सन १८७०च्या दशकाच्या मध्यापासून पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या बुद्धिजीवींवर त्यांचा प्रभाव पडला व नंतर ते बंगालमधील हिंदू प्रबोधनाचे उद्‌गाते ठरले. सद्‌गुरुदेव रामकृष्णजींचा सर्व धर्मीयांसाठी उपदेश- "जतो मत, ततो पथ- जितकी मते, तितके पंथ" हा उपदेश सहिष्णुतेचे प्रतीक आहे. परमहंसांचे पुढील उद्‌गार प्रसिद्ध आहे- "माझा धर्म बरोबर, दुसऱ्यांचा धर्म चूक, हे मत योग्य नाही. ईश्वर एकच आहे, त्याला वेगवेगळे लोक भिन्न भिन्न नावाने पुकारतात. कोणी म्हणती गॉड, कोणी अल्ला, कोणी म्हणती कृष्ण, कोणी म्हणती शिव, कोणी म्हणती ब्रह्म. तळ्यात पाणी असते परंतु कोणी त्याला पाणी म्हणतो, कोणी वॉटर तर कोणी जल. हिंदू त्याला जल म्हणतात, ख्रिश्चन वॉटर, मुसलमान पानी म्हणतात, पण वस्तू एकच असते. एकेका धर्माचे एकेक मत असते, एकेक पथ असतो, परमेश्वराकडे घेऊन जाण्यासाठी. जशी नदी नाना दिशांहून येऊन एकाच सागरात विलीन होते."

रामकृष्ण परमहंस यांचे खरे नाव गदाधर चट्टोपाध्याय होते. त्यांचा जन्म दि.१८ फेब्रुवारी १८३६ रोजी कामारपुकुर, पश्चिम बंगाल येथे एका गरीब वैष्णव ब्राह्मण कुटुंबात झाला. ते एकोणिसाव्या शतकातील एक गूढवादी आध्यात्मिक सत्पुरुष आणि सद्‌गुरु होते. ते खऱ्या अर्थाने जगविख्यात बनले, ते म्हणजे स्वामी विवेकानंद यांचे गुरू म्हणून! परमहंसदेव यांना त्यांचे सर्व शिष्य आणि आप्तेष्ट हे ईश्वरी अवतार मानत असत. सुरुवातीच्या जीवनात रामकृष्ण हे काली भक्त म्हणून प्रसिद्ध होते. भक्ती आणि गूढता यांत ते पारंगत होतेच, परंतु ती केवळ भावना होती. त्यांना देवी काली खरोखर दर्शन देत असे. ऊर्जा आणि भावना यांचा खऱ्या अर्थाने जम बसवण्यात ते कुशल बनले होते. तंत्र आणि वैष्णव भक्ती यांत त्यांना परमानंद जाणवत होता. परंतु एक दिवस तोताराम या सत्य जाणणाऱ्या महापुरुषाने त्यांना सत्य आणि कल्पना यातील फरक समजावून दिला. त्या दिवसानंतर रामकृष्ण खऱ्या अर्थाने धार्मिक आणि आध्यात्मिक अनुभवाला प्राप्त झाले. रामकृष्णजी हे अशिक्षित असल्याने त्यांची बोलीभाषा ग्रामीण होती; परंतु आध्यात्मिक अनुभवामुळे त्यांची वाणी सुमधुर आणि रसाळ होती. त्यांच्या कथांचा आणि व्याख्यानाचा बंगाली जनतेवर विलक्षण प्रभाव दिसून येत होता. अनेक तार्किक आणि बौद्धिक लोकांना देखील ज्ञान देण्यात ते यशस्वी ठरले. गदाधर चटोपाध्याय- रामकृष्ण परमहंसजी यांच्या वडिलांचे नाव क्षुदिराम चट्टोपाध्याय, काही ठिकाणी खुदीराम, असा उल्लेख आहे तर आईचे नाव चंद्रमणीदेवी असे होते. सद्‌गुरु रामकृष्णजींना लहानपणी सर्वजण गदाधर या नावाने ओळखत. शिक्षणात आणि तार्किक कौशल्यात त्यांना विशेष रस नव्हता. मातीच्या मूर्ती बनवणे, संगीत आणि कथा सांगणे यामध्ये त्यांचे विशेष प्राविण्य होते. सत्पुरुष आणि संन्यासी यांच्याकडून ते लहानपणी कथा ऐकत असत तथा कथा सांगतही असत. पुरीच्या मार्गावर असताना त्यांच्या कामारपुकुर गावात जर कोणी संन्यासी, विद्वान ब्राह्मण विसाव्यासाठी थांबले तर ते त्यांची सेवा करत असत. त्यांचा तर्कशास्त्र व धार्मिक संवाद जाणून घेत असत. वडिलांच्या निधनानंतर रामकृष्णजींचे थोरले बंधू रामकुमार यांनी कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. रामकृष्णजी हे आईच्या सानिध्यात राहू लागले. घरातील कामे, देवपूजा आणि आईची सेवा करू लागले. त्यानंतर



काही काळाने रामकुमार हे कोलकात्यात पुरोहित बनले. भावाच्या सहाय्यतेसाठी रामकृष्णजी सन १८५२मध्ये कोलकात्याला गेले. कोलकात्यात अस्पृश्य कैवर्त समाजातील एका जमीनदार घराण्यातील राणी रासमणीने दक्षिणेश्वर मंदिराची प्रतिष्ठापना केली. रामकुमार त्या मंदिरात प्रमुख पुजारी बनले. त्यांची मदत म्हणून रामकृष्णजींनी मूर्तीच्या साजसज्जेचे दायित्व स्वीकारले. सन १८५६ साली रामकुमार यांच्या मृत्यूनंतर रामकृष्णजींनी त्यांची जागा चालवली. त्यानंतर मंदिरातच ते राहू लागले. रामकृष्णांच्या अतिभाव तन्मयतेमुळे सर्व लोक त्यांना वेडे समजू लागले. त्यांचा विवाह लावून द्यावा, अशी त्यांच्या आईची इच्छा होती. गुरुदेव रामकृष्ण परमहंस यांनी विवाहाला विरोध केला नाही. कामारपुकुर गावाजवळील जयरामवाटी गावच्या रामचंद्र मुखोपाध्याय यांची मुलगी शारदादेवी यांच्याशी त्यांचा विवाह करण्यात आला.

सन १८६१ साली भैरवी ब्राह्मणी यांच्याशी रामकृष्णजींची भेट झाली. भावनिक व अध्यात्मिक शक्तीमुळे त्यांचे शरीर आणि मन असह्य वेदना सहन करत होते. त्या वेदनेचा अंत करण्यासाठी भैरवी ब्राह्मणी यांनी त्यांना तंत्रसाधना करण्यास सांगितले. त्या साधनेमुळे ते बरे होत गेले. तंत्र व मंत्र साधना पूर्ण करण्यासाठी त्यांना दोन वर्षे एवढा कालावधी लागला. रामकृष्णजी हे भैरवी ब्राह्मणी यांस मातृभावनेने पुजत असत. तर भैरवी हे रामकृष्णजींना अवतार मानत असत. भैरवी यांनी त्यानंतर कुमारी पूजेची दीक्षा दिली, ज्यात कुमारिकेला देवी समजून तिची पूजा केली जाते. गुरुवर्य रामकृष्ण हे कमालीचे भावतन्मय व्यक्ती होते. कालीपूजा, रामभक्ती, कृष्णभक्ती या सर्व देवतांच्या पुजेमध्ये त्यांनी दास्यपद स्वीकारले होते. देवी कालीला ते विश्वजननी, स्वतःची आई मानत असत. त्यांनी रामभक्ती करताना स्वतःला हनुमान आणि कृष्णभक्तीवेळी स्वतःला राधा मानून भक्ती केली. त्यांची भावना एवढी प्रबळ होती, की ऊर्जेच्या स्वरूपात त्यांच्यापुढे सर्व काही प्रकट होत असे. देवी कालीचे दर्शन, वैष्णवभक्ती, कृष्ण व रामभक्ती या सर्वांमध्ये निर्माण झालेली तल्लीनता, हे सर्वकाही त्यामुळेच घडत होते. सन १८६४ साली तोतापुरी या वेदान्तिक संन्याशाकडून त्यांनी संन्यास घेतला. तोतापुरी हे आध्यात्मिक उन्नती साधलेले सिद्ध पुरुष होते. त्यांनी त्यांना अद्‌बैत तत्त्वज्ञान शिकवले. तोतापुरी यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांनी निर्विकल्प समाधीज्ञान आणि अनुभव प्राप्त केला.

परमगुरु रामकृष्णजींना इस्लाम व ख्रिश्चन धर्मांबद्दल देखील कमालीचा आदर होता. सर्व धर्म समभाव त्यांच्या अंगी होता. जगातील सगळे धर्म म्हणजे नद्याच आहेत; ज्या शेवटी सागरास म्हणजे अद्वैत शक्तीस मिळतात, असा त्यांचा समज होता. सद्‌गुरु रामकृष्ण परमहंसांनी दि.१६ ऑगस्ट १८८६ रोजी महासमाधी घेतली. त्यांनंतर त्यांचे परमशिष्य स्वामी विवेकानंदजी यांनी रामकृष्ण मिशन या संस्थेद्वारे त्यांचे धर्मकार्य सुरू ठेवले. रामकृष्णजी यांचे विचार आणि कार्य पुढे नेण्याचे काम ही संस्था आजही करत आहे.

## जम्मू-काश्मीर : लिथियमचा साठा भारताचा चेहरा बदलेल



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जम्मू आणि काश्मीरमध्ये लिथियमचा प्रचंड साठा सापडल्याने ग्लोबल वॉर्मिंगसाठी जबाबदार असलेल्या कार्बनचे उत्सर्जन कमी करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना मोठी चालना मिळेल. लिथियम हे एक खनिज आहे जे इलेक्ट्रिक वाहने, मोबाईल फोन आणि लॅपटॉपसाठीच्या बॅटरीमध्ये वापरले जाते. डिझेल आणि पेट्रोल वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्याच्या दिशेने हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मानले जात आहे. जम्मू-काश्मीरमध्ये 5.9 दशलक्ष टन लिथियमचा मोठा साठा सापडला आहे. लिथियमसाठी भारत आतापर्यंत ऑस्ट्रेलिया आणि अर्जेंटिनासारख्या देशांवर अवलंबून होता. आता भारत या बाबतीत स्वयंपूर्ण होईल आणि 2030 पर्यंत देशातील इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन 30 टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे.**

देशात सापडलेला लिथियमचा साठा उत्तम दर्जाचा असल्याचे सांगितले जाते. भारत सरकारच्या म्हणण्यानुसार, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाला जम्मू आणि काश्मीरमध्ये 5.9 दशलक्ष टन लिथियमचा प्रचंड साठा सापडला आहे. जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यात हे साठे सापडले आहेत. रिचार्ज करण्यायोग्य बॅटरीमध्ये लिथियमचा वारंवार वापर केला जातो. स्मार्टफोन आणि लॅपटॉपपासून ते इलेक्ट्रिक कारपर्यंत प्रत्येक गोष्टीत या बॅटऱ्या वापरल्या जातात. डिझेल आणि पेट्रोल वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्याच्या दिशेने हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मानले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, जम्मू-काश्मीरमध्ये लिथियमच्या प्रचंड साठ्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगसाठी जबाबदार असलेल्या कार्बनच्या उत्सर्जन कमी करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना मोठी चालना मिळेल.

भारताच्या खनिज मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाने रियासी जिल्ह्यातील सलाल हेमना ब्लॉकमध्ये लिथियमचे साठे शोधले आहेत. हे क्षेत्र चिनाब नदीवरील 690 मेगावॅटच्या सलाल पॉवर स्टेशनपासून सुमारे आठ किलोमीटर अंतरावर आहे. जम्मू आणि काश्मीरमधील खाण विभागाचे सचिव अमित शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, लिथियमच्या साठ्याच्या शोधामुळे या प्रदेशातील आपली उपस्थिती जागतिक नकाशावर नोंदवण्यात आली आहे. आता जगभर हा संदेश गेला आहे की देश या क्षेत्रातही स्वयंपूर्ण होत आहे आणि लवकरच बोलिव्हिया, अर्जेंटिना, चिली, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि चीन यांसारख्या लिथियम निर्यात करणाऱ्या देशांमध्येही त्याची गणना होईल. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या शास्त्रज्ञांनी गेल्या वर्षी या भागात नमुने गोळा करण्याचे काम सुरू केले होते. अजून दोन स्तरांवर नमुन्यांची चाचणी व्हायची आहे. त्यानंतर सरकार खाणकामाचे कंत्राट देईल.



याआधी 2021 मध्ये कर्नाटकात असाच लिथियमचा साठा सापडला होता. मात्र ते प्रमाणाच्या दृष्टीने खूपच लहान आहे. खनिज मंत्रालयाचे सचिव विवेक भारद्वाज यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे लक्ष्य साध्य करण्यासाठी सरकारने शोध मोहीम तीव्र केली आहे. सामान्य श्रेणीतील लिथियमची श्रेणी 220 भाग प्रति दशलक्ष (पीपीएम) आहे, तर जम्मू आणि काश्मीरमधील साठ्यांमध्ये लिथियमची श्रेणी 550 पीपीएम पेक्षा जास्त आहे. सलाल कोटली गावात, सहा हेक्टर (सुमारे 120 कनाल) जमिनीत 5.9 दशलक्ष टन सर्वात हलके खनिज लिथियम म्हणजेच पांढरे सोने सापडले आहे. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जीएसआय) चे तज्ज्ञ गेल्या पाच वर्षांपासून या गावात सर्वेक्षण करत होते. लिथियम खनिज साठ्याची घनता देखील खूप जास्त आहे. म्हणजेच ज्या भागात हे खनिज सापडले आहे, त्या भागात लिथियम मोठ्या प्रमाणात काढता येतो. सलाल कोटली येथील दमण कोटमध्ये लिथियमचा मुख्य साठा आढळून आला आहे. रियासी ते अर्नास या मुख्य रस्त्यावर असलेल्या सलाल कोटलीमध्ये 40 टक्के वरच्या आणि 60 टक्के खालच्या भागात लिथियमचा साठा आहे. जीएसआय टीमने सर्वेक्षण केलेले ठिकाण चिन्हांकित केले आहे.

लिथियम काय आहे? लिथियम हे नाव ग्रीक शब्द 'लिथोस' वरून आले आहे. म्हणजे 'दगड'. हा नॉन-फेरस धातू आहे. मोबाईल-लॅपटॉप, वाहनांसह सर्व प्रकारच्या चार्जेबल बॅटरी बनवण्यासाठी याचा वापर केला जातो. हे 'मूड स्विंग्स' आणि 'बायपोलर डिसऑर्डर' यांसारख्या आजारांवर उपचार करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. आतापर्यंत भारत लिथियमसाठी पूर्णपणे इतर देशांवर अवलंबून होता. सध्या, अर्जेंटिना, बोलिव्हिया आणि चिली या तीन दक्षिण अमेरिकन देशांमध्ये त्याच्या साठ्यापैकी 50 टक्के साठा आहे. मात्र, जगातील निम्मे उत्पादन ऑस्ट्रेलियात होते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301


आधुनिक केसरी

**चळवळीमध्ये भाकर शोधणाऱ्यांची संख्या आज वाढताना दिसत आहे. स्वाभिमानाची भाकरी मिळावी म्हणजे ती खाण्याची मजा वेगळीच असते. परंतु हल्ली चळवळीच्या नावाखाली स्वाभिमान गहान टाकून लाचारीची भाकरी शोधली जात आहे हीच चळवळीची शोकांतिका आहे. सदर लेख कोणत्याही एका व्यक्तीला उद्देशून लिहला जात नसुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर चळवळीची दिशा बघितली तर चळवळीची दशा दिसून येते. तसं पाहिलं तर देव-देवतांची भुमि म्हणून प्रसिद्ध आसणाऱ्या महाराष्ट्राच्या भूमीत अनेक संत जन्मास आले.**

ज्यामध्ये प्रामुख्याने जगद गुरू संत ज्ञानेश्वर महाराज, विश्व गुरू माहत्मा बसवेश्वर, संत निवृत्तीनाथ महाराज, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत रामदास स्वामी, संत गोरा कुंभार, संत चोखा मेळा, संत नामदेव महाराज, संत कान्होपात्रा, संत स्वामी समर्थ, साई बाबा, संत अवजीनाथ महाराज, संत सद्गुरु वामनभाऊ महाराज, राष्ट्र संत भगवानबाबा संत मन्मथ स्वामी तसेच अनेक भक्तांना यशाची प्रचिती आलेले अगाध लिला असणारे शेगावीचे संत श्रेष्ठ श्री. गजानन महाराज. शेगाव ते पंढरपूर आषाढी एकादशीच्या निमित्ताने निघणारी भव्य अशी पायी दिंडी जाताना आणि परत येताना रस्त्याने दर्शनासाठी होणारी प्रत्येक ठिकाणची गर्दी संत श्रेष्ठ गजानन महाराज यांच्या बाबत लोकांच्या मनात आजही किती श्रद्धा भाव आहे .याची प्रचिती येते.तसेच पंढरपूर येथे असणारा भव्य दिव्य मठ व दैनंदिन तेथे येणारे भक्तगण येथिल व्यवस्था नियोजन, आणि सकारात्मक उर्जा गजानन महाराज आजही साक्षात आपल्या सोबत आहेत असंच जाणवतं.

गजानन महाराज यांचे अवतार कार्याची सुरुवात आजच्या दिवशी शेगाव येथे प्रकट होऊन झाली.प्रामुख्याने विदर्भात सुरवात झाली तरी अल्पावधीतच त्यांची ख्याती आणि महती राज्यासह देशात पोहचली.परंतु त्यांच्या भक्तीचा महिमा देशभरातील भक्ता मध्ये आज सुद्धा दिसून येतो. गजानन महाराज तसे तर महाराष्ट्रात पंढरपूर, नाशिक, नागपूर, अकोला, अमरावती या भागाला त्यांनी आवर्जून भेटी दिल्या. काही दिवस त्यांनी अक्कलकोट येथे स्वामी समर्थ महाराजांच्या भेटीस गेले तेथे काही दिवस आश्रमी राहिले स्वामी समर्थ महाराज यांच्या सांगण्यावरुनच आजच्या दिवशी गजानन महाराज शेगावीस आले व भक्तांचा उद्धार करु लागले. झुणका-भाकर हे महाराजांचे आवडते खाद्य म्हणून आजही भक्तगण गुरुवार करत असतांना पिठलं-भाकरीचा नैवेद्य महाराजांना अर्पित करतात. तसेच झुणका भाकरी सोबतच पिठीसाखर, मुळ्याच्या शेंगा, हिरव्या मिरच्या हे त्यांना आवडत असत. 'गण गण गणात बोते' हा महाराजांचा मंत्र होय.भक्तगण या मंत्रानेच महाराजांचा जप करतात.

महाराजांनी भक्तगणांना अशी शिकवण दिली की देव केवळ देवळात नाही तर सर्वत्र आहे. परमार्थात खोटेपणाला थारा नसतो. असे ते नेहमी म्हणत. सत्कर्म करणाऱ्याचे नेहमी चांगलेच होते असे ते म्हणत. जीवनातील प्रत्येक वळणावर यशस्वी होण्यासाठी ईश्वर भक्ती गरजेचीच असे ते म्हणत. कित्येकांना तर त्यांच्या चमत्काराची प्रचिती आली ती अशी की बापूराव नावाचा महाराजांचा एक भक्त पंढरपुरी मुक्कामी होता पण त्याला भगवान विठोबाचे दर्शन झाले नाही तर गजानन महाराजांनी स्वतः विठोबाचे दर्शन दिले., भास्कर पाटील नावाच्या शेतकऱ्याला दुष्काळात शेतीसाठी त्रास होत होता हे जेंव्हा गजानन महाराजांना कळले तेंव्हा त्याच्या शेतातील विहिर ही तुंडूंब भरुन गेली. नर्मदेमध्ये बुडणारे जहाज गजानन महाराजांच्या आशिर्वादाने तरुन गेले.



पुढे गजानन महाराज यांच्या समक्ष 1908 मध्ये श्री गजानन महाराज संस्थान स्थापन झाले . गजानन महाराज संस्थानने भक्तांसाठी सोय म्हणून पुढे संस्थानचा जीर्णोद्धार केला.

श्री गजानन महाराज यांच्या समक्षच 1909 साली मंदिर बांधकाम झाले पुढे या बांधकामात बदल होत गेले.. या मंदिराचे शिखर 51 फूट उंच आहे.. श्रीं चे दर्शन भुयारी मार्गाने होते पुढे विठ्ठलरुक्मिणीचे मंदिर असून त्या जागेला समाधीस्थळ म्हणतात. त्याला लागूनच महाराजांचे शयनगृह आहे. श्रींच्या वापरातील पलंग येथे ठेवला असून त्यावर त्यावर दोन बाजूला लोड आहे आणि मध्यभागी श्रींचा फोटो आहे. मंदिर परिसरातच एक औदुंबर वृक्ष आणि हनुमान देवताचे एक छोटेसे मंदिर आणि नागदेवतेचे मंदिर आहे. तसेच श्रींचे सेवक श्री बाळाभाऊ महाराज व श्री नारायण महाराज ह्यांच्या समाधी याच ठिकाणी आहेत.

संत श्री.गजानन महाराज हे संस्थान एक आदर्श संस्थान आहे... गजानन मंदिर संस्थान शेगांव जि.बुलढाणा येथून भक्तांकरिता देण्यात येणाऱ्या सेवा म्हणजे एखाद्या परिवारात एवढी काळजी माणसांची घेतली जात नसेल तेवढी काळजी आणि चांगल्या सेवा गजानन मंदिराच्या संस्थानाकडून देण्यात येतात. कोणत्याही व्यक्तीला बोलताना माऊली या शिवाय शब्द ऐकायला मिळत नाही. श्री गजानन महाराजांचे दर्शन तर अत्यंत शिस्तीत प्रत्येक भक्ताला मिळते कुठलीही गर्दी नाही ना कोणता गोंधळ. गजानन मंदिर शेगाव येथे जो कुणी भक्त एक रुपयापासून एक लाख रुपयापर्यंतची मदत करतो त्या भक्तांचा एकही रुपया कुठे व्यर्थ जात नाही कारण इथे भ्रष्टाचार नाही ना, कुठे व्यर्थ खर्च नाही, नियमानुसार तो पैसा खर्च केल्या जातो तो केवळ आणि केवळ भक्तांच्याच सेवा करिता मग त्यात भक्तांसाठी रुग्णालये, औषधालये, आदिवासींकरिता फिरते रुग्णालय आणि आदिवासींकरिता दिवाळीला मोफत कपडे वाटप या व्यतिरिक्त राज्यात पाच ठिकाणी आणि राज्याबाहेर एका ठिकाणी असे एकूण सहा ठिकाणी गजानन संस्थान शेगाव कडून भक्तांसाठी सर्व व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रात श्री क्षेत्र पंढरपूर येथे, श्री क्षेत्र आळंदी येथे, श्री. क्षेत्र त्रंबकेश्वर, पंपासरोवर जि.नाशिकजवळ येथे, गिरणा जि.बुलढाणा येथे आणि राज्याबाहेर मध्यप्रदेश येथे ओंकारेश्वर येथे अशा सहा ठिकाणी भक्तांसाठी राहण्यासाठी आणि जेवणासाठी अल्प दरात सेवा देण्यात येत आहेत. भक्तगणांसाठी उत्तम व्यवस्था... शिस्तीचे पालन आणि पारदर्शक कारभार म्हणून या संस्थानाची महाराष्ट्रात ख्याती आहे... कितीही गर्दी असू द्या हे संस्थान प्रत्येक भक्ताला दर्शन घेण्यास मदत करते... आणि हो देशाच्या कानाकोपर्यातून येथे भक्त येतात त्यांच्यासाठी निवासाची सोय म्हणून भक्तनिवास संकुल उभारलेले आहेत.या संस्थानामध्ये 10 हजारापेक्षा जास्त सेवेकरी आहेत... त्यामध्ये तरुण मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सेवेकरी आहेत... वर्षभर मंदिरात भजन किर्तनासारखे कार्यक्रम होतात... येथे सकाळी 5 वाजल्यापासून रात्री 9 वाजेपर्यंत पुजा आरतीसारखे कार्य अविरत चालू असते.मनाल आनंद शांती देणारा हा परीसर प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मात्र नेत्र तृप्त झाल्याशिवाय राहत नाहीत. एकंदरीत गजानन महाराज यांचे कार्य आणि महती हि थोर आहे.संत श्रेष्ठ गजानन महाराज यांची कृपा आशिर्वाद भक्तांसाठी आजही तसेच आहेत. जो सुद्धा अंतःकरणाने भक्ती करेल त्याला आजही कृपा प्रसाद लाभतो, असे महान व संत श्रेष्ठ गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम दंडवत.

# गवताची गंज



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**काही दिवसापूर्वी मोबाईलमध्ये एका गवताचे बुछाडाचे एक चित्र पाहिले. आणि तिथे लिहले होते याला तुमच्याकडे काय म्हणतात. आणि सहज मनात आले की लेख संग्रही हवाच. (म्हणजे आमच्याकडे छोट्या गोलाकार गवताच्या गंजीला बुछाड असे म्हणतात.) भुई मुगाच्या वेलाचे गवताचे सोयाबीन चे कडब्याचे बूछाड रचता येते. त्याला अजून दुसरे काही नाव आहे, की नाही माहित नाही.तेव्हा मी सहज मुलांना म्हटले हे काय आहे. ते माहिती आहे का? पण मुलाना सांगता आले नाही. अर्थात त्यांना माहिती नव्हतेच, आणि मग एका क्षणाला वाटले.ते काही नाही हे संग्रही असायलाच हवे. तसे ही या जुन्या पद्धती आता संपुष्टात येत चालल्यात जुनं जे मुजत चालले आहे , असा एखादा लेख संग्रही हवाच होता. तडक उठले जे बघितले जे माहिती आहे त्याच्या आधारे गंज लावणे, लेख लिहायला घेतला.**

गंज, गंजीची इर्जिक, आर त्यो येणार व्हता; आर ह्यो कुठं हाय, हे आणि याच्या सोबतीला सर्जा राजा आणि त्याच्या गळ्यातल्या घुंगराचा आवाज कानात घुमु लागला. त्याच्या सोबतीला ते लालभडक रस्सा असलेले ते आमटीचे भल मोठे पातेले डोळ्यासमोर येऊन गेले. गंज आणि गंजी ची ईर्जिक च नात तस तर जून चं म्हणजे गंज लावून झाल्यानंतर सर्व लोकांनी मिळून एकत्र स्नेह भोजनाचा आस्वाद घ्यावयाचा.

आज आठवणीत मन पुन्हा एकदा रमायला झालं. आणि हरवलेल्या त्या दिवसात पुन्हा एकदा हरवून जायला झालं.

हळव्या कप्प्यात जपलेल्या त्या आठवणी आजही कुठेतरी कधीतरी मनाला नवी उभारी देवून जातात.

तर अशी ही गंज लावणे पहिले गंज का लावली जाते ,ते अगोदर सांगते. सांगायचे म्हणजे गंज म्हणजे थोडक्यात पावसाळ्यातली गुरांच्या चाऱ्याची तजवीज करुन ठेवने, किंवा मग कधी ओला दुष्काळ किंवा कोरड्या दुष्काळ्याच्या काळात याचा उपयोग होतो.

खरं म्हणायचे तर गुरढोरं ,दुधदुभतं, हे शब्द आता क्वचितच ऐकायला येतात. पूर्वी म्हणजे फार पूर्वी असे ही नाही, २०एक वर्षापूर्वी जवळ जवळ सत्तर ऐंशी टक्के घरात बैल गायी गुरे होती. आताही आहेत नाही असे नाही. त्यातील बैलाचे प्रमाण त्या मानाने खूप कमी झाले आहे.गायी म्हैशी काही अंशी बघायला मिळतात. असो, उगाच विषय भरकटतोय ,

सहा हाताची, आठ हाताची, दहा हाताची , अशी सोळा हातापर्यंतची गंज माझ्या तरी ऐकण्यात आली आहे. त्यात सर्व प्रकारचे म्हणजे हायब्रीड कडबा, जोंधळ्याचा कडबा, भुईमुगाचे वाळलेले वेल, भात्यानं, मारवेल गवताच्या पेंड्या खाण्यासाठी आणि कुसळील गवताच्या पेंड्या शेकरण्यासाठी अर्थात झाकण्यासाठी आता गंजीचे त्याचा तसा फारसा उपयोग नाही .पण जुनं संग्रही असावं म्हणून फक्त हा लेखन प्र पं च गंजी चे सविस्तर वर्णन ...

शेतातील गवत कडबा वैरण याची विशिष्ठ पद्धतीने केलेली रचना म्हणजेच गवताची गंज होय.

साधारण मार्च ते एप्रिल महिन्याच्या कालावधित शक्यतो गंजी लावली जायची. अर्थात त्याला कारण असायचे ते म्हणजे खरीप आणि रब्बी हंगामातील शेतातून पीक निघालेले असायचे , शेताला एक दोन महिने उन्हाळण्यासाठी पूर्णपणे मोकळे केले जायचे.

शेताच्या बांधावरचे गवत पावसाळ्यात पुन्हा नव्याने फुटुन येण्यासाठी शेताच्या बांधावरचेही गवत ही कापले जायचे. थोडक्यात सांगते गवताच्या कडब्याच्या पाच पेंढ्यांच्या समुहाला पाचुंदा असे म्हणतात. भुईमुगाच्या वेलाच्या बाबतीत दोन डालं चार डालं अर्थात डालं म्हणजे मोठी पाटीदंडगोलाकार सारखी अर्थात विशिष्ठ पद्धतीने विणलेली साधारण दोन फूट उंच आणि खाली गोलाकार अशी ती पाटी यांच्यात उपणी, पाटी, हारा, डाल असा त्याचा अनुक्रम लागतो. याचा खर तर मुद्दाम उल्लेख केला आहे.कारण वीस वर्षापूर्वी जोंधल्याचा कडबा बांधताना बाबा बोलायचे पेंडीला आळा बसला तर तुम्ही पास, तोच आळा परवा आठवता आठवता पुरेवाट झाली.म्हणून ह्या शब्दांचा उल्लेख केला. खरं त्याची कितपत गरज आहे माहित नाही,पण तरीही...

गंज लावताना पाहिले साधारण दहा एक फूट लांब पाच एक फूट रुंद जागेचे नियोजन असायला हवे.म्हणजे अंदाजे आणि गवताच्या वैरण किती असेल त्याच्यावरून ठरवावे लागते.शक्यतो ती जमीन खडकाळ असायला हवी, किंवा तिथून उतार गेलेली जमीन असावी लागते.शक्यतो पाऊस जरी आला तरी बाज् ने पाणी निघून जावे म्हणून आणि अगदी नसेल तर वाळलेल्या लाकडाचे मचान घालून मचान थोडक्यात खाली मोठाले दगड आणि त्यावर वाळलेली जाड लाकडे आडवी उभी घालून तयार केले जाते. शक्यतो पावसाचे पाणी आले तरी त्याच्या खालून शक्यतो निघून जावे. चाऱ्याचे रक्षण व्हावे. पण हे शक्यतो छोट्या गंजी साठी किंवा शक्यतो छोट्या बु छां डा साठी उपयोगी पडते. हे सगळे झाल्यानंतर, जे जसे मी पाहिले तसे सांगत आहे. यात थोडा फार फरक असू शकतो.त्याच्यानंतर जे खाण्यायोग्य गवत नसते , ते प्रथम बाहेरील बाजूला बुडक्याची बाजू आणि आतील बाजूस शेंडा असे चारी बाजूनी जे खाण्यायोग्य गवत नसते अशा गवताचा पहिला थर घालून चारी बाजूंनी घालून मधल्या भागातही जेवढ्या पेंढ्या उभ्या समोरासमोर शेंडे करून रचना करावी लागते. अशा प्रकारे पहिला थर असे अजून एक दुसरा थर बसवावयाचा. त्याच्यानंतर कडब्याचा थर,अशाच पदधतीने बसवायचा.पुन्हा खाण्यायोग्य गवताचा तसेच भात्याण्याचा म्हणजे ज्याला जसे आवडेल किंवा जशी वैरण असेल त्याप्रमाणे अंदाजे वैरण जशी असेल त्याच्यावर अंदाज बांधून एकावर एक थर रचत जायचे,तसेच एक दोन ठिकाणी भुईमुगाच्या वेलाचे थर ही अशाच प्रकारे एकदोन ठिकाणी यायला हवे. म्हणजे असतील तरच नसेल तर तरीही चालते. भुईमुगाचे वेलं पसरणे तसे सोपच, अगदी हातानी सर्व बाजूंना समान पसरवून घेणे. त्याच्यानंतर ही गवत कडाबा भात्यान असे थर रचले जातात. वैरण काढण्याची एक विशिष्ट पदधती असते. खालपासून वरपर्यंत सर्व प्रकारची वैरण काढता यावी म्हणून अशी रचना करावी लागते. ते अशासाठी की सर्व प्रकारचा चारा गुरांना मिळवा यासाठी च फक्त अशी रचना. थर रचत असताना ही एक लाकडी चोपणे असते, चोपणे म्हणजे लाकडाचा लांब दांडा आणि एका टोकाला छोट्या पाटाच्या आकाराची आयताकार लाकडी पट्टी ) त्याने थोपटून थोपटून बाहेर आलेले बुडके आत सरकवले जातात.आणि त्याला एक सुपीरियर पणा यावा यासाठी. फक्त अशा प्रकारे दहा बारा थर असे म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे वैरण किती असेल त्याच्यवर अवलंबून असते.आणि शेवटी उभ्या आयताकार पेटी सारखा त्याचा आकार आकाराला येतो. त्याच्यानंतरत्याच उभ्या आयताकार गंजीचा वरचा भाग मध्यभागी समोरासमोर शेंडे करून पुढं पासून शेवटपर्यंत दोन दोन तीन तीन पेंढ्या चा उंचवटा करायचा, त्याला पेंढ पडले म्हणायचे. त्याच्यानंतर त्या पेंढा वर आडव्या दोन्ही बाजूला त्याच्यावर पुन्हा गवताच्या पेंढ्या गंजित टाकतो त्याच्या उलट्या दिशेने टाकून म्हणजे शेंडे खालच्या बाजूला आणि बुडके उंच केलेल्या बाजूवर टाकून गंजीला शेकराव् याचे अर्थात पावसापासून संरक्षण होण्यासाठी झाकून टाकावयाचे. ही सर्व क्रिया झाल्यानंतर गवताची यट म्हणजे गवताचा दोरखंड त्यासाठीही कोवळे कोवळे हिरवे गवत घेवून डाव्या हाताच्या तर्जनीने आणि करंगळीच्या साहाय्याने प्रथम आळा मोडून गवत विशिष्ठ पद्धतीने करंगळी आणि तर्जनीच्या साहाय्याने विणून यट तयार होते. अगदीच ओल्या गवतपासून होते असे नाही.वाळलेल्या गवतापासून ही यट तयार केली जाते.पण ती तितकीशी व्यवस्थित होत नाही. म्हणून कोवळ्या गवताचा उल्लेख केला . यटीच्या साहाय्यने अर्थात गंजीला वरच्या आणि खालच्या बाजूला बांधून टाकायचे. की गंज तयार झाली म्हणायची. यांच्यात काही त्रुटी असू शकतात, किंवा वेगळेपण ही असू शकते. जे जस पाहिलं नि ऐकल होते, त्याच्यावरून हा लेख लिहला आहे.



# क्रांतिकारांचे गुरु वस्ताद लहुजी साळवे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे.**

वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले.

या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन



तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते.

याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# धर्माची दांभिकता उदय आणि ऱ्हास



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृती विविध जाती आणि धर्मांने नटलेली आहे. अनेक जाती, अनेक पंथ, अनेक धर्म आपापल्या परीने रीतीरीवाजाने भारतभर कार्य करीत असतात. जेव्हा इतरा धर्मापेक्षा x एक समाज / धर्म जास्त असतो. तेथे धार्मिक कार्यक्रम इतरांच्या पेक्षा जास्त चालतात. खरंतर धार्मिक कार्यक्रम करणे, धर्माचा प्रचार करणे याला भारतीय संविधानाने सुद्धा मुभा दिलेली आहे. परंतु होतं असं की जिथे एक्स जातीचे किंवा एक्स धर्माचे लोक जास्त राहतात. तिथे धर्माची शिकवण होण्यापेक्षा दांभिकतेचा उच्छाद वाढलेला दिसतो. खरे तर धार्मिक कार्यक्रम धर्मप्रचार हा विचारातून, कार्यातून, मार्गदर्शनातून, वाचनातून, चिंतनातून,मदतीतून आणि प्रशिक्षणातून वाढत असतो. आणि हे कार्य करण्यासाठी एकांताची जास्त गरज असते.**

धर्मसंस्कार याला प्रत्येक धर्मामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे संस्कार एकांत आणि शांततेतून होत असतात. यातून खऱ्या धर्माचा प्रचार होतो. पण तसे होताना सर्वच धर्मामध्ये दिसून येत नाही. भारतामध्ये ऐकून धर्म याचा विचार केला तर हिंदू, इस्लाम, बौद्ध,जैन, ख्रिश्चन, सिख, ईसाई वीरशेव,यावली, शाक्य पंथ, पारशी शिव धर्म असे सर्वसाधारण धर्म भारतामध्ये आहेत. प्रत्येक धर्माचा अभ्यास केला तर सर्व धर्मातील विचारात सारखेपणा जो दिसतो, तो म्हणजे दया, करुणा, प्रेम, भाव भक्ती, परोपकार, सहिष्णुता हे विचार प्रत्येक धर्मात आहेत. जर प्रत्येक धर्मात हेच विचार असतील तर एका धर्मातील लोक दुसऱ्या धर्मातील लोकांचा द्वेष का करतात???? का करत आलेत??? प्रत्येकजण आपला धर्म वाढविण्यासाठी दुसऱ्या धर्माचा नाश का आणि कशासाठी करतात??? त्याची अजूनही कारणे सापडत नाहीत.यातून हजारो पिढ्या बरबाद झाल्या. धनसंपत्ती बरबाद झाली. तरीही लोकांना समजत नाही. ज्याचा समाज मोठा त्याचा धर्म मोठा. त्यांनी तर खऱ्या अर्थाने सामाजिक बदलाचे कार्य, मदतीचे स्त्रोत वाढविण्याचे काम सोबत दुसऱ्यांच्या प्रति आदरभाव भक्ती निर्माण करण्याचे काम करायला पाहिजे दुसऱ्यांच्या प्रति सद्भावना असायला पाहिजे. सहिष्णुता असायला पाहिजे. आणि तसे त्यांनी कार्य करायला पाहिजे. मग तो धर्म आपोआप मोठा होतो.आणि व्हायला काहीच अडचण येत नाही.हे बाजूला राहते आणि समाज मोठा धर्म मोठा याचा गर्व अहम,दंभ वाढतो यामुळे मूळ धर्माची विचारधारा बाजूला राहते. आणि मग सुरू होते ती दांभिकता. आता याची सुरुवात कोठून होते... त्याचे मूळ स्त्रोत कसे निर्माण होते. ती म्हणजे प्रार्थना स्थळे. प्रत्येक धर्मात प्रार्थना स्थळे असतात. अर्धशिक्षित, मूळ धर्माचा विचार विसरलेले, अधर्मप्रचारक, माथेफिरू, निराशा आणि नशेच्या अधीन गेलेली युवा पिढी, अशावेळी करुणा, दया, प्रेम, भक्ति,सहिष्णुता त्या विचारांची होळी होते.ज्या धर्मातील लोक जास्त त्या धर्मातील लोक इतर धर्मातील लोकांना टार्गेट करण्याचा प्रयत्न करतात. जातीत आणि धर्मात तेढ निर्माण करण्यासाठी मग सण, महोत्सव, रॅली ,असे मार्ग अवलंबून दांभिकता माजवली जाते. आणि एखादे कारण काढून मग मारामारी, रक्तपात, जाळपोळ जे जे वाईट करता येईल; ते ते केले जाते. मूळ धर्माच्या विचाराची इथे पायमल्ली होते. आणि मग कौर्य, राग, मद मस्तर, हिंसा या विचाराचा जन्म होतो. यातून धर्म बाजूला राहतो. विकृतांची झुंड रस्त्यावर उभी राहते.लोक रस्त्यावर उतरतात. मग दहशत माजते. ज्याचे त्याचे रंगीत झेंडे रस्त्यावर येतात. स्पीकर चे आवाज वाढतात. वेगवेगले रंग वेगवेगळ्या टोप्या बाजारात येतात. अशावेळी ज्या



धर्माचे लोक जास्त ते त्यांच्या धर्माचा वचक निर्माण करतात. मग यातून निर्माण होते अशांतता.यातूनच भयाची निर्मिती होते. अल्पसंख्याक धर्माचे उच्चाटन होते. आणि माणसाचं जगणं मुश्किल होतं. मला राहून राहून असं वाटतं की अशा दांभिक लोकांनी आपला धर्म वाढविण्यासाठी मदतीचे स्त्रोत उभे करायला पाहिजेत.दुसऱ्यांच्या प्रति प्रेम निर्माण व्हायला पाहिजे. शांतता, सहिष्णुता, सौंदार्य, सुख आणि समृद्धीसाठी आपली ताकद पणाला लावली पाहिजे. ते इथे कधीच आणि कुठेच होताना दिसून येत नाही. तर इथे विकृती पसरवली जाते. दांभिकता निर्माण केली जाते. धर्माच्या नावाखाली माणूसच माणसावरती शस्त्र चालवतो. त्यांच्याच धर्मातले लोक जेव्हा सहिष्णुता निर्माण करण्याचे कार्य करतात त्यांनाही ठार मारले जाते. असे रक्तपात घडवून आणणारे कोण असतात? तर ज्यांना धर्माचा मूळ अर्थ समजलेला नसतो. विचार समजलेला नसतो. यातून फक्त निर्माण होती ती विकृती. निरबुद्ध,लुटारू लोक याचा जास्त फायदा घेतात. यातून मूळ धर्माची पायमल्ली होते. आणि मग जगभर त्या धर्माची निंदा होते. खरं तर प्रत्येकाला आपला धर्म प्रिय असतो. मग आपल्या धर्माची पायमल्ली होऊ नये, निंदा होऊ नये, तो जगभर चांगले विचार घेऊन पसरला पाहिजे. असे ज्यांना वाटते त्यांनी आपल्या धर्माच्या चांगुलपणाचा उपयोग सर्व धर्मातील लोकांच्या विकासासाठी, प्राणी, पक्षी, जल ,जंगल जमिनीच्या विकासासाठी आपले कार्य वाढविले पाहिजे. करुणा, दया, प्रेम या मूल्यांचा प्रचार करायला पाहिजे. तेव्हा मूळ धर्माची विचारधारा आत्मसात करून, अभ्यास करून, त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करायला हवा. चला तर जगभरामध्ये आपला धर्म वाढू या. माणुसकी जागूया. निसर्गाचे रक्षण करण्यासाठी दोन हात पुढे देऊया...!

# आळशी मुलगा

आधुनिक केसरी

सोनपूर गावात केशव नावाचा एक मुलगा राहत होता. तो लहानपणापासून अगदी आळशी आणि कामचोर होता. तो



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आणि त्याची आई दोघेच घरात रहायचे. केशव त्याच्या आईला कोणत्याच कामात कधी मदत करत नव्हता. ई फुलं पाने यांच्या जुड्या करून विकायची, त्यातून जे पैसे मिळत त्यातूनच त्यांचा उदरनिरवाह होत असे दिवसेंदिवस त्यांची परिस्थिती अतिशय खालावत चालली होती. केशव काहीतरी काम करेल घराची परिस्थिती सुधारेल असं वाटलं होतं, म्हणून अपार कष्ट करून आईने केशवाला शिकवले मात्र केशव काहीही काम करायला तयार नव्हता. आईने त्याला खूप समजावलं मात्र त्याच्यात काहीही बदल झाला नाही. शेवटी आईनेही समाजावणे सोडून दिले.

एक दिवस फुलं विकायला जात असताना आईला घेरी आली व रस्तातच घेरी येऊन पडली. संध्याकाळ झाली तरी देखील आई आली नाही हे पाहून केशवला काळजी वाटू लागली. शेवटी आईला शोधायला केशव बाहेर निघाला आणि रस्तात कुस्करलेल्या फुलांचा पसारा आणि आईला पडलेले पाहून केशवला धक्का बसला. आईला तो घरी घेऊन आला आई तापाने फणफणत होती. आणि तिला दवाखान्यात नेण्यासाठी त्याकडे पैसे देखील नव्हते. अशावेळी त्याला आईचे सारे शब्द आठवले व तो रडू लागला. त्याच्या आळशीपणामुळे आईची ही स्थिती झाली होती. केशवचे तेव्हा डोळे उघडले. त्याने तडजोड करून आईला दवाखान्यात नेले आईला बरे वाटू लागले तेव्हा त्याने तिला वचन दिले कि तो कधीही कामाचा आळस करणार नाही, मेहनत करेल. केशवचे हे शब्द ऐकून आईचे हृदय सुकावले.



# चांगल्या विचारांची कास धरा !

आधुनिक केसरी

दिवसेंदिवस तरुणाई व्यसनाधीनतेच्या व मोबाईलच्या



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आहारी जात आहे. त्यासाठी मोबाईलपासून चार हात दूर रहायला शिका. विशेषःता व्यसनापासून दुर रहा.स्वताःला ओळखून व्यकतीमत्व विकासासाठी आयुष्यात चांगल्या विचारांची कास धरा. आजची व्यसनाधीन तरुण पीढी पाहीली की खुप वाईट वाटते. प्रत्येक आई वडीलांना वाटत असते की आपल्या मुलाने नावलौकीक मिळवावा. आई वडीलांच्या मान राखा.जीवनात कितीही प्रतिकूल परिस्थितीत येऊ द्या.संघर्ष करायला शिका. व्यसनापासून दुर राहुन तणावमुक्त जीवन जगा.जीवनात आपणच आपले गुरू व्हायला शिकले पाहिजे.स्वताला ओळखा आपल्या अंगभुत कौशल्य ओळखा.स्वताचा सर्वांगीन विकास कसा करता येईल त्यासाठी प्रयत्न करा. स्वतावरील विश्वास कधीच ढळू देऊ नका.जीवनात चांगले बोला, चांगले वागा आपल्या आयुष्यात बदल घडवायला शिका. बदल घडविणे हे आपल्याच हातात आहे. चांगल्या मित्रांची संगत धरा. चांगल्या लोकांच्या संगतीत राहील्यास चांगलेच होते. कठीण काळात ज्यांनी साथ दिली अशांचे आभार माना. जीवनात असा कोणताच माणुस नाही की ज्याच्या जीवनामध्ये चढ उतार आले नाहीत.फक्त परीस्थितीचा सामना करता आला पाहिजे.आपणच आपल्या जीवनाचे भाग्यविधाते आहोत. हे कधी विसरू नका.मी करू शकतो हा जीवनाचा मुलमंत्र आहे. अनेक सुशिक्षित तरूण आपले स्थान निर्माण करण्यासाठी झगडत असतात.त्यासाठी चांगल्या विचारांची कास धरा. प्रामाणिकपणा आणि कष्ट या दोन गोष्टींचा अंगिकार करावा.



परमेश्वराने आपल्याला हे सुंदर जीवन दीले आहे. परेश्वराचे खरोखर आभार माना. आपण चांगलं वागले तर चांगलेच होते. आपल्या स्वभावात बदल करता आला पाहिजे. मी मोठा की तु मोठा असा भेदभाव न करता सर्वांशी प्रेमाने वागा. जेव्हा आपण दुसर्यांशी चांगले वागु तेव्हाच आपले जीवन सुखकर होईल. आपलं आयुष्य खुप सुंदर सुखी आहे. ते आणखी कसे सुंदर बनवता येईल याकडे पहा. एखाद्या व्यक्तीला पाहून जगण्याची ऊर्मी मिळाली पाहिजे. आयुष्यात चांगल्या माणसांची संगत खुप महत्वाची आहे. चांगल्या व्यक्ती आपल्या जीवनात नक्कीच प्रेरणा देतात मार्गदर्शन करतात.त्यासाठी आयुष्यात चांगल्या विचारांची कास धरता आली पाहीजे.

# स्वच्छतेचे प्रसारक आधुनिक संत गाडगे महाराज



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**३ फेब्रुवारी १८७६ रोजी शेंडगाव ता. दर्यापूर, जि. अमरावती या गावी झिंगराजी व सखुबाई जानोरकर या परीट समाजातील गरीब माता-पित्याच्या घरी जन्म घेतलेला डेबू, मोठेपणी लोकसंत गाडगेबाबा म्हणून ओळखले गेले. वयाच्या आठव्या वर्षी पितृछत्र हरवले आणि सखुबाई व डेबू यांच्यासमोर दुःखाचा डोंगर उभा राहिला. त्यानंतर दापुरा या गावी ते त्यांचे मामा चंद्रभान यांच्याकडे राहायला गेले. तेथे ते मामाची जनावरे घेऊन रानात जाऊ लागले. लहानपणी गोठा साफ करण्यासाठी हाती घेतलेला खराटा पुढे त्यांची ओळख ठरली. गावात गावकऱ्यांसोबत भजन म्हणण्याची डेबूला आवड निर्माण झाली. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. प्राण्यांची हत्या करणे त्यांना पसंत नव्हते.**

हळूहळू त्यांच्या विचारांचा प्रभाव गावातील तरुण गटावर पडू लागला. भजनी मंडळेही

डेबूजी भजनी मंडळ म्हणून ओळखले जाऊ लागले. भजनात देवकीनंदन गोपाळाचा सूर गुंजू लागला. भजन सप्ताहात दलितांना मिळणारी उपेक्षित वागणूक व उष्टे अन्न या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी दलितांना एकाच पंगतीत बसवून सहभोजन घडवून आणले. त्या काळात हे मोठ्या सामाजिक क्रांतीचे पाऊल

उचलले गेल्याचे इतिहासात नोंदवले गेले आहे. वयाच्या सोळा-सतराव्या वर्षी धनाजी खारकर यांच्या कुंती नावाच्या मुलीगी डेबूचा विवाह झाला व त्यांच्या गृहस्थाश्रमास सुरुवात झाली. पुढे चंद्रभान मामाचा मृत्यू झाल्यावर संसाराची सर्व जबाबदारी डेबूवर पडली. तिकडे


सावकाराच्या सावकारी पाशाला विरोध करुन डेवूने स्वतःला अन्ययाविरुद्ध उभा राहणारा तरुण म्हणून समाजात नावलौकिक मिळविला. त्यांना मुलगी झाली, तेव्हा मटण व दारु अशा मेजवानीसह बारसे न करता शाकाहारी पद्धतीचे जेवण त्यांनी दिले. समाजबाधंवांना हात जोडून मटण व दारुमुळे आपण आपला संसार कसा नासवतो ते समजून सांगितले. अशाप्रकारे त्यांची विचारसरणी पंचक्रोशीत प्रभाव करु लागली होती. दौलतगिरी या गोसाव्याला गुरु केल्यानंतर गुरुच्या व्यसनाची माहिती मिळताच त्यांनी दौलतगिरीचे शिष्यत्व नाकारले. लोकहिताची कामे व अडचणी सोडविणे या कामामध्ये व्यस्त असलेल्या डेबूला लोक देवीसिंग या नावाने ओळखू

लागले. माणसाला माणूस म्हणून कसे जगात येईल, त्याच्यासाठी काय करता येईल, या विचारांनी गाडगे महाराज सतत विचारात मग्न राहू लागले. अशातच तीन महिन्यांची गर्भवती पत्नी, मुली अलोका, कलावती यांना सोडून त्यांनी अंगणातील खापराचे गाडगे च अंगावरील वस्त्रानिशी घरदार सोडले व समाजाच्या हितासाठी

भटकंती स्वीकारली ती कायमचीच. लोकोद्धारासाठी तथागत भगवान बुद्धाप्रमाणे घरदार सोडलेल्या डेबूला लोक गाडगेबाबा, गाडगेमहाराज या नावाने ओळखू लागले. ऋणमोचन गावच्या यात्रेत कुंतीबाईनी मंदिराचा रस्ता साफ करणाऱ्या गाडगे महाराजांना मुलाच्या जन्माची बातमी दिली व घरी परतण्याची गळ घातली पण लोक उद्धार हेच आपले जीवनध्येय मानून त्यांनी घरी परतण्यास नकार दिला. जवळपास १९०५ ते १९१७ या कालावधीत

गाडगेबाबा सतत फिरत राहिले. त्यांनी भीक मागून जेवण केले. अंगावर फाटक्या चिंध्या पांघरल्या, झाडाखाली झोपले. महाराष्ट्राला ओळख होईपर्यंत त्यांनी खडतर आयुष्य उपभोगत गोरगरिबांच्या समस्या जाणून घेत भटकंती केली.

हळूहळू गाडगेमहाराजांची कीर्ती सर्वत्र पसरु लागली. त्यांच्या मागे मीठा समाज उभा राहिला. त्यांची स्वच्छता मोहीम एकट्यापुरती मर्यादित राहिली नव्हती, त्यात लोकही सहभागी होऊ लागले. दिवसा हातात खराटा घेऊन गाव स्वच्छ करणारा व चार दोन घरी शिव्याशाप ऐकत भीक मागणारा हा फकीर रात्रीच्या कीर्तनामुळे गावातील लोकांचा जननायक होऊ लागला. प्रसंगी दगडांचा चिपळ्याप्रमाणे वापर करणारा हा संत गावागावात लोककल्याणाचा संदेश पोहचवू लागला. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यास पाणी, मुला-मुलींना शिक्षण या शिकवणीसह नवस देवधर्माच्यामुळे आजारी माणूस बरा होत नाही तर तो औषधाने बरा होतो हा त्यांचा विज्ञानवादी उपदेशही गावागावात प्रभावशाली ठरु लागला. प्राणिहत्या करु नका, कर्ज काढून लग्न, जना करु नका. ही महत्वाची शिकवणही त्यांनी लोकांत रुजवली. ५ मे १९२३ रोजी कळले. कुत्रा रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण या गावी गाडगेमहाराज कीर्तनास गेले होते. कीर्तन सुरु करण्यापूर्वी त्यांचा मुलगा गोविंद मरण पावल्याचे वृत्त चावल्यामुळे चौथ्या वर्गातील हा मुलगा मेल्याचे वृत्त ऐकून गाडगेबाबा कीर्तनास उभे राहिले, ऐसे गेले कोट्यान् कोटी! काय रडू एकासाठी...! अशी सुरुवात करून त्यांनी कीर्तन केले. कीर्तनाच्या माध्यमातून ते सारा महाराष्ट्र फिरले. समाजात



वैचारिक क्रांती घडविली. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे चालविली, धर्मशाळा बांधल्या, वसतिगृहे सुरु केली. ऋणमोचन येथे चार घाटांचे बांधकाम, मूर्तिजापूर गोरक्षण संस्था, पंढरपूर धर्मशाळा, नाशिक, आळंदी, देहू, त्र्यंबकेश्वर, पुणे याठिकाणी धर्मशाळा अशी अनेक कामे करीत त्या काळात त्यांनी चौदा लाख रुपये लोकवर्गणीतून खर्च केले, मात्र स्वतःचा फाटका वेश आणि गाडग्यात भिक्षा मागून आलेले अन्न यावरच त्यांचा चरितार्थ चालत राहिला. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शाळेचे अनुदान बंद झाल्यावर गाडगेबाबा तत्कालीन मुख्यमंत्री खेर यांना अनुदान सुरु करण्याविषयी बोलले व अनुदान सुरु झाले. सेवाग्रामच्या परिसरात महात्मा गांधी व गाडगेबाबांची भेट घडली. बाबांचे कीर्तन ऐकून महात्मा गांधी मंत्रमुग्ध झाले. संत चोखामेळा धर्मशाळा बांधून तिची व्यवस्था गाडगेबाबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपविली. डॉ. आंबेडकर व गाडगेमहाराज एकमेकांचा फार आदर करत. बाबासाहेब गाडगे महाराजांचे कीर्तन गर्दीत बसून ऐकण्यात धन्यता मानत. पुढे गाडगे महाराजांची प्रकृती साथ देत नव्हतीपण आंबेडकरांच्या मृत्यूच्या बातमीनंतर ते अधिकच अस्वस्थ झाले. १३ नोव्हेंबर १९५६ ला कैकाडी महाराजांच्या निमंत्रणावरुन पंढरपूरला केलेले कीर्तन अखेरचे कीर्तन ठरले आणि ६ डिसेंबर १९५६ ला डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर अवघ्या पंधरा दिवसात महाराष्ट्राने आपला थोर सुपुत्र गाडगेबाबांच्या रुपाने २० डिसेंबर १०५६ ला गमावला. गावाच्या पारावर आला कुणी झाडुवाला बाबासफाई करून पाराची घेतला गावाचा ताबा  सांगा म्हणे, किती आहेत देव तुमच्या गावात

खंडोबा, म्हसोबा, मरीमाय..लेक गुंतले नावात

तोच सांगे मग वाजवून दगडाच्या चिपळ्या

नाव अनेक तरी देव एकच आहे ना गड्या

नशापाणी नका करू अन् नका पाहू जातपात..

नका देव वाटून घेऊ नका करू माणसाचा घात देवाच्या नवसासाठी तुम्ही कापू नका बकरू दवाखान्यातच बरं होईल आजारी लेकरू कर्ज काढून नका वाजवू गड्याहो लग्नाचे ढोल  जत्राबित्रा पुरे करून जाणा शिक्षणाचे मोल  पितर घालण्यापरी जित्या मायबापाला जपा  हुंड्याच्या पैशान सजत नाही संसाराचा खोपा विचार देऊन निघे, कंबरेला झाडू बांधून  कुणी पाया पडे नेमका गर्दीत संधी साधून  फटकारे त्यास म्हणे, मी माणुसच आहे ना बाप्पा देवकीनंदन गोपाला म्हणून फक्त माणुसकी जपा आज आपण ग्रामस्वच्छता, परिसर स्वच्छता असे अनेक उपक्रम राबवतो. शासनही संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान राबवते. ग्रामसफाई, व्यसनमुक्त, अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडाविरोध यांचे पालन करणे हीच गाडगे महाराजांना खरी श्रद्धांजली होय!

# घुंघट, बुरखा, पडदा पद्धत स्त्रियांच्या गुलामीचे प्रतीक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मानवी समाजाच्या सुरुवातीपासूनच स्त्रियांना गुलाम बनवण्याचे षड्यंत्र आणि प्रयत्न सातत्याने होत आहेत. पण हळूहळू मानवी समाजाने आपल्या जुन्या सनातनी परंपरा संपवण्याचा प्रयत्न केला, पण आजही अनेक शक्ती या परंपरांच्या बाजूने उभ्या आहेत. महिलांना गुलाम बनवण्याचा प्रकार केवळ एका धर्मात नाही तर प्रत्येक धर्मात आणि प्रत्येक समाजात सातत्याने षडयंत्र होत आहेत. आजकाल तुम्ही बघतच असाल, कर्नाटकात मुस्लिम मुली हिजाबला विरोध करत आहेत, तर तीच हिंदू मुलं हिजाबला विरोध करत आहेत. एकीकडे आपण म्हणतो देश संविधानानुसार चालला पाहिजे आणि दुसरीकडे आपण म्हणतो की प्रत्येक समाजाला, प्रत्येक व्यक्तीला आपल्या मर्जीनुसार जगण्याचे स्वातंत्र्य आहे. हे कसले स्वातंत्र्य?**

आज मुस्लीम समाज कर्नाटकातील मुस्लिम मुलींच्या बुरखा आणि हिजाबच्या समर्थनार्थ बाहेर पडत आहे. मला त्यांना थेट प्रश्न विचारायचा आहे की, तुमच्या समाजातील स्त्रियांनी जुन्या रूढीवादी परंपरांपासून मुक्त व्हावे असे तुम्हाला वाटत नाही का? तुमच्या समाजातील महिलांनी पुढे जायचे असेल, तुमची पावले जुळवावीत आणि देशाचा नावलौकिक मिळवावा असे वाटत असेल, तर तुम्ही दोन बोटींमध्ये बसू नका, तर गुलामगिरीचे प्रतीक असलेल्या रूढीवादी परंपरा, कपडे, दागिने यांच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे. जर तुम्हाला वाटत असेल की तुमच्या समाजातील मुली कर्नाटकात बरोबर आहेत, तर यातून एक गोष्ट स्पष्ट होते की तुमच्या समाजातील मुली गुलामगिरीतून मुक्त व्हाव्यात असे तुम्हाला वाटत नाही. आता तुम्ही मला प्रश्न कराल किंवा माझ्या प्रश्नांची उत्तरे द्याल की हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे, तर भावा, जी संस्कृती एखाद्या व्यक्तीला किंवा समाजाला गुलाम बनवते, ती संस्कृती नष्ट होणे साहजिक आहे.

सर्वप्रथम शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कोणत्याही विशिष्ट धर्माच्या घोषणा देणे घटनात्मकदृष्ट्या चुकीचे आहे. शाळा, महाविद्यालये संविधानानुसार चालतात.संविधान धर्मनिरपेक्षतेवर आधारित आहे.काही लोक म्हणतात की शाळा, महाविद्यालयांमध्ये गणवेश आहे जो सर्वांना लागू आहे, अशा परिस्थितीत मुस्लिम मुलींना हिजाब घालण्याचे समर्थनकरणेघटनात्मकदृष्ट्या चुकीचे आहे. घटनात्मकदृष्ट्या खूप चुकीचे होत आहे. अनेक शाळांमध्ये कोणत्याही देवीची मूर्ती बनवणे, कोणत्याही देवीची पूजा करणे, हेही घटनाबाह्य आहे, हेही आपण सर्वांनी पाहिले पाहिजे. सर्वसाधारणपणे ते चुकीचे आहे.संविधानाने देश चालवायचा असेल किंवा चालवायचा असेल तर आपण सर्वांनी आपली धार्मिक विचारधारा घरात कोंडून ठेवली पाहिजे. तुम्हाला वाटेल की आम्ही एका विशिष्ट समाजाचे आहोत. भारतातील बहुतांश ग्रामीण भागात बुरखा घालण्याची प्रथा अजूनही जोरात सुरू आहे. पुरुष वर्गालाही स्त्रियांना बुरख्यात ठेवायला आवडते आणि घराच्या चार भिंतीत राहायला भाग पाडतो.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची रचना करून महिलांना घोंगड्यांच्या प्रथेपासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र ग्रामीण भागातील महिलांना त्यांचे हक्क माहीत नसल्यामुळे त्या ही प्रथा जोपासत आहेत . घुंगट न घालणाऱ्या शहरी महिलांना ती कुत्री मानते, पण तसे नाही, महिलांनाही मोकळेपणाने श्वास घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, तो त्यांचा हक्क आहे. त्यांचा चेहरा एवढा वाईट आहे का की ते कोणालाही दाखवू शकत नाहीत, त्यांच्या इच्छेविरुद्धही त्यांच्यावर जबरदस्ती का केली जाते? त्यांचे प्राणीजीवन मानवी जीवनात का बदलले जात नाही? ही एक प्रकारची गुलामगिरी आहे.



**स्त्रियांच्या स्थितीत फरक** ज्या ज्या ठिकाणी स्त्रीशक्तीला संविधानाने दिलेले हक्क माहीत आहेत, त्या महिलांनी आपल्या हक्कांसाठी नक्कीच आवाज उठवला आहे आणि ही कुप्रथा बंद करण्यात मोलाचे योगदान दिले आहे. राज्यघटनेने सर्वांना मुक्तपणे जगण्याचा अधिकार दिलेला असताना महिलांनी बुरख्याला आपला सन्मान का मानायचा? तोंड का झाकता? भारतीय स्त्रियांच्या तुलनेत परदेशी स्त्रियांना मुक्तपणे जगण्याचे स्वातंत्र्य आहे, तसेच भारतातही आहे पण केवळ संविधानाच्या पानांवर. जमिनीवर अंमलबजावणी करणारे मर्यादित लोक आहेत, जे स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य देतात.

**राजस्थानातील बुरखा परंपरा**

राजस्थानच्या पश्चिम भागात, जोधपूर विभागातील जालोर, सिरोही, जैसलमेर, बारमेर, नागौर आणि पाली जिल्ह्यांमध्ये बुरखा प्रथा मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे, कोणीही बुरखा प्रथेच्या विरोधात बोलत नाही किंवा त्यावर बंदी आणण्याचा मुद्दा उपस्थित करत नाही. काही लोकांनी आवाज उठवला तरी समाजाच्या इतर ठेकेदारांकडून त्यांच्यावर आरोप केले जातात, त्यांना महिलांना गुलाम बनवायला आवडते म्हणून त्यांना बुरख्याला विरोध करण्यापासून रोखले जाते.

अनेक जण समानतेबद्दल बरेच बोलतात, पुरुषांना समान अधिकार देण्याच्या चर्चा करतात, पण स्त्री  गुलामगिरीचे प्रतिक असलेल्या बुरख्या पद्धतीकडे बहुतांश भागात कोणीच लक्ष देत नाही. यावर कोणी उघडपणे बोलत नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे महिला स्वतः बुरख्याला आपला सन्मान मानतात. जेव्हा त्यांना सांगितले जाते की बुरखा एक प्रकारे तुमची गुलामगिरी दाखवतो आणि आदर नाही. तरीही आपण बुरख्याशिवाय कसे जगू यावर ती ठाम आहे. सासू-सासरे, भावजय, वडीलधाऱ्यांसमोरचा पडदा आपण काढला नाही तर आपल्या इज्जतीचं काय होणार? आता त्यांना कोण समजावणार की हा त्यांच्या प्रगतीतील अडथळा आहे. मान्य आहे की अनेक स्त्रिया याला छंद मानतात किंवा आपला सन्मान मानतात, पण अनेक स्त्रिया असा डंख सहन करतात आणि आतून गुदमरत राहतात, त्या समाजात उघडपणे बोलू शकत नाहीत किंवा विरोधही करू शकत नाहीत. अनेक वर्षांपासून ही प्रथा त्यांच्यावर अशाप्रकारे लादण्यात आली आहे की, ज्याखाली ते गाडले गेले आहेत, त्यातून त्यांना बाहेर काढणे कठीण आहे. पण या जगात कोणतेही काम अशक्य नाही, सर्वांनी त्याविरोधात आवाज उठवला तर सर्व काही शक्य आहे.


**स्त्रियांचे अधिकार**

भारतीय राज्यघटनेत दिलेल्या अधिकारांची आपण स्त्री-पुरुषांना जाणीव करून दिली पाहिजे, त्यांना मोकळेपणाने बोलण्याचे आणि परिधान करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. पुरुष स्त्रियांइतके शोषण जगले तर कसे होईल? कोरोनाच्या जमान्यात मास्क वापरतांना गुदमरल्या सारखं व्हायचं. अनेकांनी तर या दरम्यान मास्क घातलाच नाही. मास्क घातलाच  जीव गुदमरतोय, अशी तक्रार अनेक पुरुषांनी कोरोना काळात केली. मग कल्पना करा की त्या महिलांचे काय होत असेल ज्यांना तुम्ही प्रत्येक क्षणी बुरख्याखाली ठेवता. संविधानात दिलेल्या अधिकारांची सर्वांना जाणीव करून देऊन त्यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. सर्वांना समानतेने जगण्याचा अधिकार आहे, कोणीही कोणाचा गुलाम नाही. करोडो महिलांना स्वातंत्र्य मिळवून देणारे महापुरुष डॉ भीमराव आंबेडकर हे सर्व एकटे करू शकतात, तरच आपण सर्वांनी संघटित होऊन हे कार्य यशाकडे नेऊ शकतो. बुरखा व्यवस्थेच्या विरोधात आपण निस्वार्थपणे आवाज उठवला तर आपण त्यातून मुक्त होऊ शकतो आणि स्त्रीशक्तीला मुक्तपणे जगण्याचे स्वातंत्र्य देऊ शकतो.

# मनात विचार आला..!

आधुनिक केसरी

मी शिवरायांच्या प्रथिमेकडे
पाहिल अन् मनात विचार आला
हेच ते छत्रपती ज्यांनी अठरापगड
जाती, बलुतेदार, अलुतेदार
सोबत घेऊन स्वाभिमानाचे
स्वराज्य निर्माण केले..!!
मी फुलेंच्या प्रतिमेकडे पाहिलं
अन् मनात विचार आला हेच ते
महात्मा ज्यांनी स्त्री-पुरुष भेद न
ठेवता सर्वांना शिक्षणाची दारे
खुली केली..!!
मी शाहुराजांच्या प्रतिमेकडे
पाहिल अन् मनात विचार आला
हेच ते राजर्षी ज्यांनी जात-पात,
धर्म न पाहता समतेवर आधारित
राज्याची स्थापना केली..!!
मी बाबासाहेबांच्या प्रतिमेकडे
पाहिलं अन् मनात विचार आला
हेच ते घटनाकार ज्यांनी न्याय,
हक्क, समानतेचा अधिकार,
स्वातंत्र्य देऊन धर्मनिरपेक्ष
नवभारत निर्माण केला..!!
मी अण्णा भाऊंच्या प्रतिमेकडे
पाहिलं अन् मनात विचार आला
हेच ते साहित्यरत्न ज्यांनी
आपल्या लेखणीतून कामगार,
शेतकरी, शोषित, पीडित,
वंचितांचे दुःख जगाच्या
दरबारात मांडले..!!
मी माणसांच्या गर्दीकडे पाहिलं
अन् मनात विचार आला हेच
ते हैवान ज्यांनी या महामानवांना
जातीपातीत वाटलं,
जाती-धर्माच्या नावावर
अन्याय, अत्याचार, दंगली
घडवल्या त्यांच्याच प्रतिमेचे झेंडे
घेऊन त्यांचे कार्य विचार
पायाखाली तुडवले..!!



लेखक/कवी-सुरज साठे
9370626619



# मोतीनाला रुंदीकरण कामाचा आ.शाह यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर मतदार संघात आ.फारुख शाह यांनी आपल्या कार्य शैलीद्वारे वेगळा ठसा उमटविलेला आहे. निव्वळ विकासाचा ध्यास हाच आमुचा मूलमंत्र या उक्तीप्रमाणे आ.शाह यांनी विकास कामांचा धडका लावलेला आहे. शहर वासीयांच्या नेमक्या समस्या आणि गरजा ओळखून काम करण्याची पद्धत प्रशंसनिय आहे. धुळे शहरातील शहर व साक्रीरोडला जोडणाऱ्या मोतीनाल्यावरील अरुंद पुलामुळे वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे नागरिकांना गैरसोयीला तोंड द्यावे लागेत ही गरज ओळखून आ.फारुख शाह यांनी मोतीनाला पुल रुंदीकरणासाठी ४ कोटी रुपये निधी मंजुर करून आणला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणाऱ्या पुलाच्या रुंदीकरणाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी सार्वजनिक. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर.आर. पाटील, कनिष्ठ अभियंता लोकरे, मनपा कनिष्ठ अभियंता हेमंत पावटे.सलीम शाह नगरसेवक नासिर पठाण, मूक्तार अन्सारी, नगरसेवक गनी डॉलर, नगरसेवक सईद बेग, माजी नगरसेवक अनिल दामोदर, मौलवी शकील, इकबाल शाह, आमिर पठाण, साजिद साई, राजु शेख, साबीर सैय्यद, निजाम सय्यद, कैसर अहमद, आबिद शाह,आसिफ शाह, सलीम शाह, मोईनोद्दीन शाह,जावेद शाह, छोटू मच्छी वाले, माजीद पठाण, मुस्ताक पहिलवान, जोगेंद्र जाधव , साकिव शाह आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या वाट्याला स्वातंत्र्य आलेच नाही

## दैठण्याच्या सभेत अमर हबीब

आधुनिक केसरी न्यूज



**परभणी :** महात्मा गांधीनी शेतकऱ्यांना सैबत घेऊन स्वातंत्र्याचे आंदोलन लढले, परंतु स्वातंत्र्यानंतरही शेतकरी पारतंत्र्यात आहे. शेतकऱ्यांच्या वाट्याला स्वातंत्र्य आलेच नाही असे प्रतिपादन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी केले. ते परभणी तालुक्यातील दैठणा येथे झालेल्या जाहीर सभेत बोलत होते. व्यासपीठावर ऍड.मिलिंद यादव, ऍड अरविंद सोळंके कुपटेकर, ऍड.चोखट यांची उपस्थिती होती. सभेचे संचालन सुभाष कच्छवे यांनी केले.

या प्रसंगी अमर हबीब म्हणाले की, म. गांधी भारतात आल्यानंतर त्यांनी चंपारण्य येथे पहिले आंदोलन शेतकऱ्यांसाठी केले. सरकारने नागरिकांवर बंधणे घालु नयेत. त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच करू नये असा पत्रव्यवहार ही नेहरूंना केला होता. शेतकरी आत्महत्या या १८जुन १९५१ च्या पहील्या घटनादुरुस्तीचा परिणाम आहे. शेतकरी हा रेल्वेचा डबा नसून इंजिन आहे. देश उभा करावयाचा असेल तर अगोदर शेतकरी उभा करावा लागेल. कमाल शेतजमीन धारणा कायदा, जमिन अधिग्रहण कायदा, आवश्यक वस्तु हे नरभक्षी कायदे रद्द झाल्याशिवाय शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळणार नाही. शेतकऱ्यांनी भरलेल्या करातूनच देश चालतो आहे असेही हबीब म्हणाले. सभेचे प्रास्ताविक सुभाष कच्छवे यांनी केले. अमर हबीब यांनी आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी 19 मार्चला एक दिवस उपवास करावा असे आवाहन केले.

# शासनाच्या नोंदणीकृत कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर



आधुनिक केसरी न्यूज

**बालमटाकळी :** विश्वकर्मा सामाजिक व बहुउद्देशीय संस्था बोधेगाव यांच्या व सौ ताराई फाउंडेशन बालमटाकळी यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी विविध उपक्रमातुन कामगारांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिरात महिला व पुरुष कामगारांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन तपासणी करून घेतली. शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील बोधेगाव येथे साध्वी बन्नौमाँ दर्ग्यात शासनाच्या नोंदणीकृत कामगारांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी काशी केदारेश्वर संस्थांनचे मठाधिपती महंत बाबागिरी महाराज हे होते.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या बांधकाम कामगारासाठी विविध योजनेद्वारे व विविध सामाजिक संस्थेद्वारे सामाजिक कार्यक्रम राबविला जात आहे त्यातच शेवगाव तालुक्याच्या बोधेगाव व परिसरातील किमान दोन हजाराहुन अधिक कामगारांच्या उज्वल भवितव्यासाठी व कामगारांच्या आरोग्य आबादित राहण्यासाठी विश्वकर्मा सामाजिक व बहुउद्देशीय संस्था बोधेगाव व सौ. ताराई फाउंडेशन बालमटाकळी यांच्या संयुक्त विद्यमाने नोंदणीकृत बांधकाम कामगारांची मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी काशी केदारेश्वर संस्थांनचे मठाधिपती महंत बाबागिरी महाराज, विश्वकर्मा सामाजिक व बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष गोकुळ पा. घोरतळे, उपाध्यक्ष सिताराम पाटील, सचिव सचिन राजपुरे , विकास परदेशी, जालिंदर पोटभरे, महबूब शेख, चंद्रकांत गायकर, पंचायत समितीचे माजी सभापती व जि.प. सदस्य प्रकाश बापू भोसले माजी सरपंच रामजी अंधारे ज्येष्ठ नेते कुंडलिकभाऊ घोरतळे, संदीप देशमुख वंचितच्या महिला तालुकाध्यक्ष संगीता ढवळे, वंचितचे जिल्हा उपाध्यक्ष बनुभाई शेख, रामजी केसभट, सामाजिक कार्यकर्ते बाबा पठाण डॉ.आदेश पवार, डॉ. कृष्णा मोरे, प. ल . तांबे, अनिल परदेशी, गणेश घुमरे, राजेंद्र डमाळे, सुगंध खंडागळे, लक्ष्मण देवडे मामा, केशव आंधळे, सुनील रजपूत, रुपाली राजपुरे, अनिता भोसले, कविता घोरतळे, सुनिता जाधव, पत्रकार पांडुरंग निंबाळकर, पत्रकार जयप्रकाश बागडे आदींसह महिला व पुरुष कामगार उपस्थित होते.



# संत कबीर विद्यालयात प्रजासत्ताक दिन व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संत कबीर विद्यालय नक्षत्रवाडी येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. संत कबीर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा विठाबाई माधवराव बोरडे, उपाध्यक्ष कमलेश बोरडे, सचिव धनंजय माधवराव बोरडे यांच्या मार्गदर्शनाने विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक पवार एस. बी. यांच्या उपस्थितीत श्रीमती कुलकर्णी एल.एम यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीतांवर सुंदर असे नृत्य सादर केले. नाटक, गीत गायन सादर करून उत्साहाचे वातावरण निर्माण केले. तसेच सामुहिक कवायत, लेझीम सादर करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन कांबळे, सतीष निकम, मोहित त्रिवेदी, साळवे सर, बाबासाहेब गायकवाड, व्यंकटेश सर, देशमुख सर या मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम आनंदात साजरा झाला. सांस्कृतिक कार्यक्रमास पालकांची व परिसरातील नागरिकांची उल्लेखनीय उपस्थिती होती. अतिथी मान्यवर व मुख्याध्यापक पवार एस. बी. यांच्या हस्ते विद्यालयात घेतल्या गेलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान प्रदर्शनात प्रथम, द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यालयात विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी खूप परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्रीमती. कावले जे.डी व श्रीमती कुलकर्णी एल.एम यांनी केले.

# खुलताबादच्या न्यायालयात मिटला पती-पत्नीचा वाद

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** न्यायालयात पती-पत्नीचा सुरू असलेला कौटुंबिक वाद न्यायाधीश श्रीमती डॉ एस व्ही राज कुंटवार पक्षकारांच्या वकिलांच्या मध्यस्थीने राष्ट्रीय लोक अदालत मध्ये मिटला असून पत्नी न्यायालयातून पती समवेत नांदायला गेली राष्ट्रीय लोक अदालतील कौटुंबिक व दिवाणी तसेच फौजदारी स्वरूपाचा अनेक प्रकरणाचा निपटारा झाला यावेळी दिवाणी व फौजदारी कौटुंबिक भारतीय स्टेट बँक महाराष्ट्र बँक भारत संचार निगम लि यांची वादपूर्वक प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी वीस प्रकरणे व प्रलंबित असलेले 17 प्रकरणे तडजोडी त निकाली काढण्यात आले वादपूर्वक प्रकरणी एकूण रक्कम रुपये ४,५३०७० रुपये वसुली करण्यात आली प्रलंबित प्रकरणा त २१५६५० रुपये एकूण ६६८२२० रुपये रक्कम वसूल करण्यात आले या लोक अदालतील निपटारा केलेल्या एका प्रकरणात पती हा जळगाव जिल्ह्यातील रहिवासी असून पत्नी खुलताबाद तालुक्यातील आहे दोघांचा 2010 मध्ये विवाह झाला होता पती हा शिक्षक असून पत्नीचे डीएड बीएड झाले आहे त्यांना दोन मुले असून पती-पत्नीचा तब्बल दहा वर्ष सुखी संसार होता दोन वर्षांपूर्वी पासून काही कारणास्तव पती-पत्नीमध्ये वाद निर्माण झाला पत्नी माहेरी गेली तिने सदर प्रकरण खुलताबाद दिवाणी न्यायालयात दाखल केले लोक अदालतीत न्यायाधीश श्रीमती डॉ एस व्ही राज कुंटवार पक्षकारांच्या वकिलांच्या मध्यस्थीने दोन लहान मुलांच्या उज्वल भविष्यासाठी पती-पत्नीचा वाद मिटला तसेच खुलताबाद तालुक्यातील ताजनापुर येथील पंढरीनाथ काळे व संजय काळे या दोघा भावांचा वडिलोपार्जित जमिनीमध्ये कमी ज्यादा हिस्सा मिळवण्यासाठी 1918 पासून खुलताबाद दिवाणी न्यायालयात सुरू असलेला वाद ही मिटला दिवाणी न्यायाधीश के, स्तर तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती खुलताबाद श्रीमती डॉ एस व्ही राज कुंटवार यांनी पॅनल प्रमुख म्हणून तर पंच म्हणून ऍड एस पी खोसरे ऍड ऍड भास्कर नलावडे ऍड अब्बास पटेल ऍड निहाल पटेल यांनी कामकाज पाहिले.



# रत्नागिरीमध्ये घडला 'ड्रंक अँड ड्राईव्ह'चा प्रकार !

## जिल्हा पोलीस मुख्यालयाकडून गंभीर दखल; पोलीस शिपाई निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** पोलीस कर्मचाऱ्याने उडवल्या तब्बल आठ गाड्या उडवल्याचे थरार नाट्य शहराजवळील कुंवारबाव येथे घडले. यामुळे नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात जिल्हा पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या एका सातपुते नामक पोलीस शिपायाला निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान या गावात धडक झाल्यानंतर या प्रकरणाची तक्रार कोणी केलेली नव्हती. मात्र जिल्हा पोलिसांकडून दखल घेत या प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. पुन्हा असे प्रकार घडू नयेत असा स्पष्ट इशारा जिल्हा पोलीस मुख्यालयाकडून देण्यात आली आहे. यापूर्वी अलीकडे दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आला आहे. तर एक कर्मचारी व्यसनमुक्ती केंद्र मध्ये सध्या उपचार घेत आहे, अशी माहिती उपलब्ध झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी सूत्र हाती घेतल्यानंतर ते या सगळ्या गोष्टीवर लक्ष देऊन आहेत. त्यामुळे आता जिल्हापोलीस अधीक्षक यांच्या बद्दल असलेला आदर अधिक वाढला आहे. ड्रंक अँड ड्राइव करण्याचाच हा प्रकार होता हे आता स्पष्ट झाला आहे. या सगळ्या प्रकाराने काल एकच खळबळ उडाली होती. काल संध्याकाळी आठ वाजण्याच्या सुमारास हातखंबावरून एक पोलीस कर्मचाऱ्यांने तब्बल आठ गाड्यांना ठोकल्याची घटना घडली होती. हे पोलीस कर्मचारी नाणीज येथील बंदोबस्त आटपून आपल्या ताब्यातील गाडी घेऊन रत्नागिरीच्या दिशेने येत असताना हातखंब्या च्या पुढे कुंवारबाव पर्यंत जवळजवळ आठ गाड्या त्यांनी ठोकल्याची घटना घडली आहे .
दरम्यान संबंधित पोलीस कर्मचारी हा एक्स मिलिट्री मॅन असून सध्या मुख्यालय येथे कार्यरत आहे. दरम्यान घडलेल्या घटनेने एकच खळबळ उडाली असून काही गाड्या ह्या पर्यटकांच्या होत्या. त्या रत्नागिरीतून बाहेर पडत असताना हा अपघात झालेले आहेत. संबंधित पोलीस कर्मचारी हा दारू पिऊन गाडी चालवत होता का ? असा प्रश्न उपस्थित केला जात असून कालच त्यांची मेडिकल टेस्ट करण्यात आलेली आहे. त्यांच्या मेडिकल टेस्टच्या रिपोर्टवरूनच त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे समजते. दरम्यान प्रवासी बाहेरचे असल्याने त्यांनी पोलिसात तक्रार केली नव्हती मात्र या सगळ्या प्रकारची दखल जिल्हा पोलीस मुख्यालयाकडून घेण्यात आली आहे. एकाच वेळी सात ते आठ गाड्यांना ठोकल्याने अनेक नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीस कर्मचारी सुसाट असल्याने आता नागरिकांनी करायचे तरी काय हा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र या सगळ्यावर आता कुणीही बेजबाबदारपणे वागल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक



धनंजय कुलकर्णी व प्रशासनाने ही कठोर कारवाई करत योग्य तो ईशाराच दिला आहे.



## युवा परिवर्तन संस्थेचा वर्धापन दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील युवा परिवर्तन व्यावयायीक प्रशिक्षण केंद्र येथे संस्थेच्या 25 वर्ष पूर्ण झाल्या निमित्ताने वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मोहन गाडेकर होते. त्याचबरोबर रितेश शाक्य सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदशन करतांना संस्थेच्या कार्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. प्रमोद धुळे यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले की, आज ज्या व्यक्तीमुळे आपणास कौशल्य प्राप्त करण्याची संधी मिळाली ती व्यक्ती म्हणजे बाळासाहेब खेर यांच्या विचारातून ही संकल्पना समोर आली आणि समाजातील तळागाळातील सर्व घटकातील लोकांना स्वयंम रोजगार निर्माण करून एक दुसरी संधी निर्माण करून देण्याचा काम त्यांनी केले आहे.आणि यातूनच असंख्य युवक युवती आज स्वःत च्या पायावर ठामपणे उभ्या आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीवनी नवल यांनी केले.

आभार दीपाली सोनवणे तसेच सोनाली गाडेकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवानी शेंदूरकर, ईशा कळकुंबे, हसीना मेश्राम, प्रज्ञा खेत्रे, प्रतिभा चव्हाण, निलिमा खाजेकर, प्रेरणा खाजेकर, उन्नती चव्हाण, शीतल लहाने, रोहिणी रगडे, रेणुका राऊत, साक्षी शिंदे, नेहा रत्नपारखे, नेहा कीर्तने, ज्ञानेश्वरी गवंडे, श्वेता वाकुर्डे व मयुरी पोले यांनी परिश्रम घेतले.

## शासकीय विश्रामगृह नांदेड येथे लोकस्वराज्य आंदोलनची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** क्रांतीगुरु लहुजी साळवे पुण्यतिथी व राष्ट्रसंत रविदास जयंती निमित्त लोकस्वराज्य आंदोलनाच्या सर्व सन्माननीय पदाधिकारी, लढाऊ आंदोलक यांच्या विशेष बैठकीचे आयोजन दिन 17 फेब्रुवारी दुपारी 12 वा शासकीय विश्राम ग्रह नांदेड येथे करण्यात आले असून सदर बैठकीस आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामचंद्र भरांडे सर, मा.व्ही जी डोईवाड, रावसाहेब दादा पवार हे मार्गदर्शन करणार असून जेष्ठ सल्लागार नारायणराव पोतरे व डी. एन. शेळके साहेब, रा. ना. मेटकर सर एम जे पिंगळे सर, बालाजी पाटोळे सर, हे बेठकीस उपस्थित राहणार आहेत.

हदगाव, हिमायतनगर, भोकर, इस्लापूर लोहा, मुखेड आदी ठिकाणच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात येणार आहेत. पुणे बार्टी कार्यालया समोर आंदोलनाचे युवक आघाडी प्रदेशाध्यक्ष ॲड दत्तराज गायकवाड व पदाधिकारी यांचे चालू असलेले बेमुदत धरणे आंदोलन, मुंबई येथील मोर्चा संदर्भात प्रचार आणि जबाबदारी याचे नियोजन करण्यासाठी सदर बैठकीस आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन अर्जूनराव गायकवाड, बि. एम. गोणारकर, गंगाधर भंडारे, पंडित वाघमारे, संतोष तेलंग, बाळासाहेब टिकेकर, राजकुमार जांभळिकर, संभाजी वाघमारे, अंकुश गायकवाड, मानिक कांबळे, कैलास सुर्यवंशी, नागोराव कमलाकर, धोंडोपंत बनसोडे, नागोराव कुडके सचिन वाघमारे, संजय खानजोडे, नागोराव कमलाकर, गंगाधर शिंदलोन, शिवाजी बोयनर, प्रकाश ननूरे, एकनाथ रेडे, किशन गोरेकर पि. जि. केदारे, साई जळपतराव, नागेश गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, हनमंत नामाकार, दीपक बाजड, जेजेराव मोरे, दत्ता पवार यांनी केले आहे.

## दोन शिक्षकांमध्ये फ्रिस्टाईल हाणामारी

आधुनिक केसरी न्यूज

**जत/सांगली :** गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥ या गुरू मंत्राला लाजवणारी व काळीमा फासवणारी घटना जत तालूक्यात घडली आहे. तालूक्यातील एका नामांकित व प्रसिध्द अशा शिक्षण संस्थेतील पुर्व भागातील माध्यमिक शाळेत दोघा शिक्षकांमध्ये तुंबळ फ्रिस्टाईल हाणामारी झाल्याची घटना घडली. दोघांमधील हाणामारी शालेय वेळेतच झाल्याने विद्यार्थी वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोंघा शिक्षकांमध्ये नेमके कोणत्या कारणाने जुंपली याचे कारण मात्र समजू शकले नाही. मात्र विद्यार्थ्यां व इतर शिक्षकांसमोरच ही सर्व घटना घडल्याने विद्यार्थ्यांमध्ये घटनेची चर्चा रंगली होती. विद्यार्थी-विद्यार्थी मध्ये वादविवाद, मारामारी होताना खुप वेळा पहावयास मिळते पण खुद्द संस्काराचे धडे देणारे शिक्षकच एकमेकांवर धावून जाताना व एकमेकांना लाथाबुक्यांचा वापर करताना पाहून मुलांनाही आश्चर्याचा धक्का लागला असेल. अशा शिक्षकांकडून विद्यार्थ्यांनी कोणते संस्कार व आदर्श घ्यावे हेही प्रश्न आता विद्यार्थ्यांना व पालकांना पडलेला आहे. घडलेली घटना गंभीर असली तरी मुख्याध्यापक व संस्थाचालक या घटनेवर कोणती कारवाई करतात की प्रकरण मिटवतात यावर लक्ष केंद्रीत होत आहे. गेल्या काही वर्षापासून शाळेत किंबहुना संस्थेत गलथान कारभार सुरू आहे. गेली कित्येक वर्षे या शाळेत ठाण मांडून बसलेले शिक्षक या शाळेत आहे. नेमके या शिक्षकांना कुणाचा आशिर्वाद आहे कि हे शिक्षक आपल्या शिक्षकी पेशा विसरून शाळेत गावगुंडासारखे वागत आहेत. नेमके यांच्यावर कुणाचे नियंत्रण आहे की नाही असा प्रश्न पडत आहे. शाळेत उशीरा येणे, वरिष्ठांना उध्दट बोलणे, एकमेकांना शिवीगाळ करणे, मद्यप्राशन करून शाळेत येणे, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून वर्गात शिकवणे असे प्रकार घडतच आहेत. संचालक मंडळाच्या समोरच या घटना घडत असल्या तरी संस्थाचालक मुग गिळून गप्प आहेत. अशा प्रकारचे गंभीर प्रकरण घडत असले तरी प्रकरण मिटवण्याकडे संस्थाचालकांचा कल असतो. पण यामध्ये विद्यार्थीवर्गांचा किती नुकसान केला जात आहे याकडे कुणाचेच लक्ष नाही. हेही प्रकरण अशाच पध्दतीने मिटवले जाईल की दोषींवर कारवाई केली जाईल याबाबत चर्चा रंगत आहे.

## यशस्वी व्यावसायिकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रांतीवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ व सत्यशोधक दर्पणच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, क्रांतीगुरु लहुजी साळवे यांच्या स्मृतीदिनानिमित्ताने व साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशतब्दी वर्षानिमित्ताने मातंग समाजातील १०० व्यवसायिकांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रविवार रोजी सकाळी ११ वाजता मौलाना आझाज संशोधक केंद्र, टिव्ही सेंटर, औरंगाबाद येथे आयोजित केला. या कार्यक्रमासाठी उद्घाटक डॉ. भागवत कराड, अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भगवानराव वाघमारे (लातुर), असणार आहे. तर विशेष अतिथी म्हणुन श्री. अजित रॉय तोगरे(सीजीएसटी,औ,बाद), श्री. क्रांती भावे(नागपुर), अनिल म्हस्के (महाव्यवस्थापक- लो.अ.सा. वि. म, मुंबई) लाभणार असून प्रमुख अतिथी म्हणुन प्रा. संजय गायकवाड, श्री. वसंतराव गालफाडे, इंजि. मधुसुदन कांडलीकर, डॉ. दिगंबर नेटके, इंजि. दिपक लांडगे, मा. राजु आहिरे, श्रीमती जिजा साने, आंदीची उपस्थिती लाभणार असुन नविन व्यवसायिकांना, उद्योजकांना कशा प्रकारे संधी उपलब्ध होणार असुन यावर मार्गदर्शन होणार आहे. तसेच मातंग समाजातील १०० यशस्वी व्यवसायिकांचा सत्कार येथे होणार आहे. त्याप्रमाणे वकील, पत्रकार मंडळीचाही या ठिकाणी सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यकम्रासाठी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन एस.पी. चव्हाण, अर्जुन रसाळ, भाऊसाहेब काळुंके, प्रसाद कांबळे, प्रा. सुरेश चौथाईवाले, समाधान वाणी, उमेश नेमाडे, डॉ. पंकज वैरागड, अमोल साळवे, पी.एस.अस्वले, विजय कसारे, कचरु अढागळे, राजु खाजेकर, श्रीकांत घुले, योगेश दणके, विनोद साबळे, राम आव्हाड, दिपक सुर्यवंशी, रामदास गायकवाड, किशोर दणके, विलास खोतकर, इंजि. उत्तम उफाडे, मच्छिंद्र पुलावले, बबन गायकवाड, अनिल दाभाडे, नागेश गायकवाड, विजय आहिरे, किशोर तुपे, संदिप मानकर, संतोष नाडे, सुदाम कनगरे, संतोष शेजुळ आंदीने केले.

## गोकुळसिंग राजपूत यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील दैनिक मराठवाडा साथी'च्या वतीने देण्यात येणारा पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार-2023 ची घोषणा निवड समितीने जाहीर केली आहे. यामध्ये दैनिक आधुनिक केसरीचे व दैनिक आनंद नगरीचे सोयगाव तालुका प्रतिनिधी जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.त्यांना हा पुरस्कार औरंगाबाद येथील एका विशेष पुरस्कार वितरण समारंभामध्ये देण्यात येणार आहे अशी माहिती राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांनी दिली.

राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल राज्य पत्रकार संघाचे प्रदेशअध्यक्ष वसंत मुंढे, मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदूलाल बियाणी, दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी व दैनिक आधुनिक केसरीच्या टीमने गोकुळसिंग राजपूत यांचे अभिनंदन केले आहे. राज्यस्तरीय जेष्ठ पत्रकार पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजपूत यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## कॉम्पिटीशन करिअर अकॅडमीत सेवालाल महाराज जयंती



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कॉम्पिटीशन करिअर अकॅडमी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र येथे सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. क्लास चे संचालक संजय मुडे सर यांनी श्री संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्यवर प्रकाश टाकला आणि त्यांच्या असणारे गुण अंगिकारावे असे आवाहन केले.
विशाल सपकाळ सर आणि श्री सचिन तवार सर यांनी मार्गदर्शन केले. क्लासच्या विद्यार्थीनिंनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी क्लासचे विद्यार्थी विशाल राठोड, राहुल राठोड, अजय राठोड, रुपेश जाधव, कैलास पवार, सतीश चव्हाण यांनी प्रयत्न केले.



# देवाई महिला पतसंस्थेच्या शाखेतील एटीएमचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिकलठाण येथील देवाई महिला पतसंस्थेच्या शाखेचे विस्तारीकरण व एटीएमचा शुभारंभ नुकताच संपन्न झाला. देवाई महिला पतसंस्थेची चिकलठाण येथील शाखा निश्चीत प्रगती करेल अशी अशा चिकलठाणचे माजी सरपंच अण्णासाहेब चव्हाण यांनी संस्थेच्या शाखा विस्तारीकरण व एटीएमच्या शुभारंभप्रसंगी बोलताना व्यक्त केली. याप्रसंगी चिकलठाणचे सरपंच शिवाजी घनेघर, अशपाक सेख, शिवप्रभु ज्ञाने, वाल्मीकराव दांडेकर, सोपान जाधव, नानासाहेब चव्हाण, युवराज चव्हाण, काकासाहेब काळे यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व्यक्तींची उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक महादेव काकडे यांनी संस्थेच्या मोबाइल अँप, क्युअरकोड, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस, एसएमएस सेवा संबधी माहिती देऊन संस्था इतर पतसंस्थेच्या तुलनेत चांगली सेवा राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे देण्याची ग्वाही दिली.

यावेळी प्रा. दिनेश बाटोरे, अँड अविनाश औटे यानीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार संस्थेचे मुख्यव्यवस्थापक अरुण पूर्णपात्रे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण कदम, भारकर शिमोहे, राहूल अधाने, गोविंद वराडे, रणजित काऊनकर, सचिन राठोड, दिनेश राठोड, सचिन वाकडे, स्वप्नील शिन्दे, अप्पासाहेब चव्हाण, सागर कापसे, सचिन लाटे, यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जीवनातील अडचणींचे सविस्तर उत्तर म्हणजे रामायण कथा

## रामरावजी महाराज ढोक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मानवी जीवनातील समस्या ,प्रश्न व अडचणीवरील समर्पक उत्तर म्हणजे रामायण कथा आहेत, ते बुधवार (ता.१५)रोजी आयोजित तुलसी रामायण कथेत बोलत होते.जीवनातील कठीण प्रसंगांना सामोरे जातांना त्यातील उकल करण्यासाठी रामायण कथा मार्गदर्शक ठरतात असेही ढोक महाराज पुढे म्हणाले येथील श्री साई बहुउद्धेशिय सेवा भावी संस्थेने आयोजित केलेल्या श्री साई सच्चरीत पारायण सोहळ्या निमित्त या रामायण कथा आयोजित केलेल्या आहेत. या प्रसंगी जिल्ह्याचे माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगांवकर, नगराध्यक्ष शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी, उपजिल्हा प्रमुख संजय पा. निकम, तालुका प्रमुख सचिन वाणी यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांनी महाराजांचे पूजन केले. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी करून आभार मानले. कैलास साखरे, विशाल संचेती यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आरंभी ढोक महाराज यांनी भगवा ध्वज फडकविला, व श्री. गणेश, प्रभू रामचंद्र, हनुमानजी व महादेव पिंडीचे पूजन केले, जेष्ठ नागरिक पी.एम. शिंदे,उत्तमराव साळुंके, रवींद्र अप्पा साखरे,प्रकाश शेठ बोथरा, काशिनाथशेठ गायकवाड, अखिल शेख, भगवान तांबे, सीताराम शेठ व्यवहारे, अशोक धसे, धोंडीराम ठाकूर यांनी द्वीप प्रज्वलित केले. मंडळाचे जितेंद्र चापानेरकर, प्रेम राजपूत, शैलेश पोंदे,सुधीर लालसरे, राजू लालसरे,मनोज दौडे, अण्णा अधिकार, अरुणा कुलकर्णी, प्रविणा वाळेकर,इला पालेजा, योगिता साखरे, संतोषी लालसरे,छाया भावसार यांनी सहभाग नोंदविला.



# अवैध धंदे बंद करा; महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील अवैधरित्या होणारी वाळु वाहतुक मुरूम वाहतुक अवैध दारू गुटखा व इत्यादी सर्वत्र परवाना नसताना विनापरवाना चालु असलेले अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावे, असे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतिने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सिल्लोड यांना देण्यात आले सिल्लोड तालुक्यातील अवैध धंदे बंद न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला यावेळी निवेदन देताना माजी तालुकाध्यक्ष अण्णासाहेब हावळे पाटील विधानसभा अध्यक्ष सतोश शिंदे तालुका उपाध्यक्ष गजानन सुरडकर संजय दांडगे तालुका सचिव सचिन कळम योगेश शिंदे विकास शेळके राहुल कोठाळे गणेश डिंडोरे यांच्या सह मनसे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय स्वागत 12 यांच्या संयुक्त विद्यमाने बंजारा समाजाचे आराध्य दैवत क्रांतिकारी जगद्गुरु संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे कोषाध्यक्ष नारायण कोलते यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळेस संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावरती प्रकाश टाकून आदिवासी बंजारा समाजासाठी केलेले कार्य यावरती प्राचार्य मुख्याध्यापक नारायण कोलते यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले यावेळेस संस्थेतील विकास पाटील विनोद जाधव विजय सिंग राजपूत सुदाम राठोड संजय जोशी मुकुंदा व्यवहारे श्रीकृष्ण सोनवणे भास्कर ससाने पोपटराव सोनवणे भूषण देसले प्राध्यापक पंजाबराव शेळके योगेश थोटे जयराम घोटी अनिल पडोळ गणेश मोने दीपक सिसोदे योगेश शेळके संजय अमृतकर सुनील कुमार चव्हाण सतीश खवले मोहन बोरे व शिक्षकेतर कर्मचारी श्याम जाधव अजबराव चव्हाण राहुल बडक गजानन चव्हाण बाबासाहेब कोलते संदीप कोलते इत्यादी कर्मचारी हजर होते परिसरातील प्रतिष्ठित पत्रकार गोकुळ सिंग राजपूत रहीम पठाण सुनील चोरमले बहादुर सिंग चव्हाण सुनील चव्हाण इत्यादी कार्यक्रमाला उपस्थित होते अशी माहिती प्राध्यापक जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) सावळदबारा ता सोयगाव यांनी बोलताना दिली.



# विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्यविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागाच्या वतीने मौजे उमरविहिरे येथे तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य 2023 अंतर्गत मानवी आहारात पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व व प्रचार मोहीम राबवण्यात आली. या प्रचार मोहिम मधे ग्रामस्थांना सखोल अशे मार्गदर्शन कृषी अधिकारी एस.जी.जाधव यांनी मार्गदर्शन केले की दररोजच्या आहारात पौष्टिक तृणधान्य घेतल्यामुळे मानवी शरीरास होणारे फायदे व पुढील काळात तृणधान्य पिकांचे पेरणी क्षेत्र कसे वाढवता येईल याविषयी कृषी सहाय्यक पी.आर. वाघ आणि प्राथमिक शाळेचे शिक्षक संदीप चौधरी सर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शाळेतील कर्मचारी, शाळेतील विद्यार्थी व सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी बांधव , प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत सेवालाल महाराजांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथे सर्वप्रथम ग्रामपंचायत कार्यालयात संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर संत सेवालाल महाराजांची जयंती मोठ्या थाटामाटात साजरी उत्साहात साजरी करण्यात आली. घरोघरी महाप्रसादाचा भोग लावण्यात आले व पूर्ण गावात संत सेवालाल महाराज यांची जन्मोत्सव निमित्ताने पालखी मिरवणूक फिरवण्यात काढण्यात आली. १५ फेब्रुवारी हा दिवस म्हणजे बंजारा समाजासाठी एक मोठा सण म्हणून साजरा करीत असता या दिवशी समाजातील प्रत्येक व्यक्ती महिला कुठे जाता पूर्ण दिवस हा जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करीत असतात बंजारा समाजाचे रुढी परंपरेनुसार दरवर्षीप्रमाणे



संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करतात हा दिवस सण म्हणून ओळखला जातो जयंतीनिमित्त पूर्ण गाव एकत्र होऊन राजकीय मतभेद बाजूला ठेवून पूर्ण गाव मिळून जयंती साजरी करतात एकमेकांशी भेटीगाठी महिला वर्ग हे पूर्ण घरासमोर परिसर स्वच्छ ठेवून रांगोळ्या काढतात. वर्षांत एक दिवस असा असतो की, त्या दिवशी महिला पुरुष समाजातील लहान मुलापासून प्रत्येक तांड्या वस्ती वर फक्त एकच नाव असतो. तो म्हणजे संत सेवालाल महाराजसमाजाची ओळख म्हणून संत सेवालाल महाराज यांची प्रत्येक घरोघरी पूजा व महाप्रसादाचा भोग लावतात व पूर्ण गावात मिरवणूक पालखी घरोघरी फिरवता समाजाच्या रूढी परंपरेनुसार बंजारा समाजातील महिलावर्ग बंजारा समाजाचा पोशाख घालून समाज बोली रूढी परंपरेनुसार बंजारा बोली गायन नृत्य कला करितात याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, सरपंच मोरसिंग चव्हाण, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला, बालगोपाल,व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती ग्रा. सदस्य वरदानसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

# ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारणारे वासुदेव बळवंत फडके !

आधुनिक केसरी

**17 फेब्रुवारी वासुदेव बळवंत फडके यांचा स्मृतीदिन. ब्रिटिश सरकारच्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारे आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्यावर थोडक्यात टाकलेला प्रकाश. वासुदेवांचा जन्म वासुदेवांचा जन्म शिरढोण (जि.रायगड) येथे 1845 या वर्षी झाला. त्यांचे आजोबा अनंतराव हे कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. 1818 मध्ये इंग्रजांनी तो त्यांना रिकामा करून देण्यास सांगितले. ते नाकारून त्यांनी इंग्रजांशी सतत तीन दिवस लढाई केली. अशा आजोबांच्या स्वातंत्र्य प्रीतिचा वारसा घेऊन वासुदेव जन्माला आले. त्यांची घरची श्रीमंती होती. वैभवात जन्मलेले वासुदेव गोऱ्यापान वर्णाचे, सरळ नाकाचे, पाणीदार निळसर डोळ्यांचे आणि सुदृढ शरीरयष्टी असलेले तगडे वीर होते.**

नोकरीत असतांना ब्रिटिशांच्या सैन्य व्यवस्थेची माहिती मिळवणे शिक्षणानंतर मुंबईत जी.आय्.पी. रेल्वेत ग्रँट मेडीकल महाविद्यालयात वासुदेवांनी काही काळ चाकरी केली; पण वरिष्ठांशी खटका उडून त्यांनी ती चाकरी सोडली आणि मिलीटरी फायनान्स कार्यालयात चाकरी धरली. 1865 या वर्षी त्यांचे पुणे येथे स्थानांतर (बदली) झाले, त्यावेळी त्यांना 60 रुपये मासिक वेतन होते आणि त्यांच्या कामावर वरिष्ठ इंग्रज अधिकारी खूश असत. सैनिकी विभागाशी संबंध असल्यामुळे ब्रिटिशांच्या सैन्य व्यवस्थेची बरीचशी माहिती त्यांना आपोआपच मिळाली.

**अन्यायी ब्रिटिशांविरुद्ध चीड निर्माण होणे**

1870 या वर्षी वासुदेवांना आई अत्यवस्थ असल्याचे वृत्त शिरढोणहून कळले. तिला भेटण्यासाठी त्यांनी कार्यालयातून सुट्टी मागितली; पण ती त्यांना मिळाली नाही. उलट अपशब्द ऐकावे लागले. वासुदेव तसेच आईच्या भेटीला निघून गेले; पण ते तेथे पोहचण्याआधीच आई मृत्यू पावली होती. आपल्या आईची शेवटची भेट होऊ न देणारा इंग्रज अधिकारी आणि एकंदर इंग्रज यांच्या विरोधात त्यांचे मन फार प्रक्षुब्ध झाले.

**स्वदेशी वस्तू वापरण्याची शपथ घेणे**

1871 या वर्षी पुण्यात काकांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून जनतेची गाऱ्हाणी दूर करण्यासाठी आघाडी उघडली. वासुदेवांनी त्यांच्या या कार्यात भाग घेतला. 1873 मध्ये काकांनी खादी वापरण्याचे व्रत घेतले, तेव्हा वासुदेवांनीही फक्त स्वदेशी वस्तू वापरण्याची शपथ घेतली आणि ती आजन्म पाळली.

**गुप्त संघटना स्थापन करणे**

वासुदेव बळवंत फडके सुट्टीच्या दिवशी जवळच्या खेड्यापाड्यांत जाऊन स्वदेश आणि स्वातंत्र्य यांवर व्याख्याने देत फिरू लागले. गरीब जनतेची दुःखे जवळून पाहू लागले. 'इंग्रजी राजवटीमुळेच तुमची ही अशी दैना आहे', असे ते शेतकऱ्यांना सांगू लागले. त्यांनी पुण्यात तरुणांसाठी तलवार आणि दांडपट्टा चालवण्याचा अन् मल्लविद्या शिकवण्याचा वर्ग काढला. तो गुप्तपणे रात्री किंवा पहाटे नरसोबाच्या देवळापलीकडे निवांत जागेत चाले. त्यात शे-दीडशे तरुण येत. त्यात शरीर कमवण्यासाठी एक वर्ष अभ्यासाला सुट्टी देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हेही होते. या तरुणांतून तापून सुलाखून निघालेल्या निवडक तरुणांची त्यांनी एक गुप्त संघटना स्थापन केली. प्रभात फेऱ्यांमधून, शाळा महाविद्यालयांना दिलेल्या भेटींतून आणि भक्तीपर कार्यक्रमांतून ते आणि त्यांचे सहकारी आपल्या कार्याचा प्रचार करत. दसऱ्याला रास्त्यांच्या वाड्यात शस्त्रपूजनाचा मोठा समारंभ होई. त्या वेळी दही-पोह्यांचा द्रोण हातात घेऊन स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रतिज्ञा हे सभासद घेत. इंग्रजांचे हे राज्य उलथून स्वातंत्र्य मिळवल्याखेरीज देशाचे भले होणार नाही, अशी त्यांची खात्री झाली आणि त्यांच्या मनात बंडाचे विचार चालू झाले. ते आत्मवृत्तात म्हणतात, 'ज्या भूमीच्या पोटी आपण जन्मलो, तिच्याच पोटी ही सारी लेकरे झाली, त्यांनी अन्नावाचून उपाशी मरावे आणि आपण कुत्र्याप्रमाणे पोट भरत रहावे, हे मला पहावले नाही, म्हणून मी ब्रिटीश सरकारविरुद्ध बंड पुकारले.'



**ब्रिटीशांविरुद्ध बंड**

ही वेळ राजकीय बंडाची म्हणजे दरोडे घालून राज्यसत्तेला आव्हान देण्याचीच होती. शिवाजी महाराजांनी मोगल राजवटीविरुद्ध प्रथम तेच केले होते. 1879 च्या फेब्रुवारीत शिवरात्रीच्या मुहुर्तावर रामोशी, मांग इत्यादी लोक आणि काही पांढरपेशे लोक अशा दोन-तीनशे लोकांच्या सेनेसह त्यांनी थामारी गावावर पहिला दरोडा घातला. त्यानंतर त्यांनी घातलेल्या एका मागून एक अशा अनेक दरोड्यांमुळे इंग्रज सरकार चक्रावून गेले.

**ब्रिटीशांच्या कह्यात सापडणे**

जून 1879 मध्ये ते गाणगापूरात परतले. नजीकच रहाणाऱ्या रोहिल्यांशी 500 घोडेस्वारांची नवी सेना उभारण्याचा करार केला आणि पैसे आणण्यासाठी ते पंढरपुरात निघाले. तेव्हा त्यांना पकडण्यासाठी 1500 हिंदी आणि गोरे सैनिक मेजर डॅनिअलच्या हाताखाली सतत खपत होते. हेरांकडून डॅनिअलला त्यांचा सुगावा लागला. सतत 42 घंट्यांच्या पाठलागानंतर त्यांना देवरनावडगी येथे 20 जुलैच्या मध्यरात्री निद्रिस्त असता अटक करण्यात आली. पकडल्यानंतरही डॅनिअलला द्वंद्वयुद्धाचे आव्हान त्यांनी दिले; पण त्याने ते स्वीकारले नाही. त्यांच्या बंडाच्या माहितीसाठी त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. पुण्याच्या सत्र न्यायालयात त्यांच्यासह 16 जणांवर इंग्रज शासनाविरुद्ध 'सशस्त्र बंड पुकारण्याचा, कट केल्याचा, त्यासाठी माणसे आणि शस्त्रे गोळा केल्याचा, शासनाच्या विरोधात राजद्रोह पसरवण्याचा आणि दरोडे घालण्याचा' असे आरोप ठेवण्यात आले.

**ब्रिटीशांकडूनअतोनात हाल आणि मृत्यू**

फडकेंच्या स्वप्नाला आणि ध्येयाला पेलेल असा प्रतिसाद न मिळाल्यामुळे या आद्यक्रांतीकारकांच्या नशिबी जन्मठेप, काळेपाणी, एडनचा कारागृह, तेथे तेलाचा घाणा चालवणे, चक्की पिसणे असे भोग आले. त्यांचे तेथे हालहाल करण्यात आले, मांसाहार करत नाहीत म्हणून उपाशी ठेवण्यात आले. दीड वर्षातच म्हणजे 12 ऑक्टोबर 1880 या दिवशी मध्यरात्री त्यांनी आपल्या बेड्या तोडून, कोठडीची जड दारे उखडून, कारागृह फोडून पलायन केले. ते बारा मैल तसेच पळत होते. दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणात पोलीस आणि सोजीर त्यांच्या पाठलागावर निघाले आणि दुपारी 3 वाजता त्यांना वीर आनंद या ठिकाणी पकडून परत कारागृहात आणले. मग जडातील जड बेड्या, एकाकी कोठडी आणि छळ चालू झाला. त्यांचे भीमकाय शरीर खंगत गेले. क्षयाने ते जर्जर झाले आणि वयाच्या केवळ अडतिसाव्या वर्षी 17 फेब्रुवारी 1883 या दिवशी सायंकाळी 4.20 वाजता त्यांनी देह ठेवला.

अन्यायी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारणारे आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांना स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन !

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**समन्वयक, हिंदू जनजागृती समिती,**
**संभाजीनगर-जालना**
**संपर्क क्र.: 8208443401**

# सम्राट संबोधणाऱ्या राष्ट्रवादीचे औरंगजेबाशी नाते काय..?

## जयंत पाटील यांनी खुलासा करावा : भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** औरंगजेबाला सम्राट संबोधणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे औरंगजेबाशी नेमके काय नाते आहे... याचा जाहीर खुलासा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील यांनी करावा असे आवाहन भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मानवतेचा क्रूर हत्यारा औरंगजेबचा उल्लेख सम्राट असा करणे म्हणजे त्या पक्षात औरंगजेब कुणाचा नातेवाईक आहे का..? असा संतप्त सवाल भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला असून पक्षाने आता औरंगजेब राष्ट्रवादी पक्ष असे नामकरण करावे असा सल्ला ही त्यांनी दिला आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना भाजपा प्रवक्ते कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षाने नुकतेच छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन दिले असून औरंगजेबाच्या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करण्यासाठी शासनाकडे मागणी केली त्यात उल्लेख करताना सम्राट औरंगजेब असा उल्लेख केल्याने केवळ मतासाठी लांगून चालन किती करावे हा राष्ट्रवादी पक्षाचा लाळघोटेपणा उघडकीस आला. औरंगजेब हा राष्ट्रवादी पक्षासाठी आदर्श असून पक्षातील कोणाचा नातेवाईक आहे का..? कारण, त्यांच्या दृष्टीने औरंगजेब हा सम्राट असेल पण, याच औरंगजेबाने आमचे आदर्श छत्रपती संभाजी महाराजांना चाळीस दिवस बंदिस्त व हाल-हाल करून क्रूरपणे मारून टाकले मग तो आमच्यासाठी सम्राट कसा काय होऊ शकतो असा सवाल त्यांनी केला ? तसेच मध्यंतरी राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ही औरंगजेबाबाबत गौरवोद्गार काढले होते हे कसे विसरता येईल, आमच्या दृष्टीने औरंगजेब हा मानवतेचा हत्यारा असून तो सम्राट होऊच शकत नाही असे म्हणत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटलांना औरंगजेब आपला आदर्श वाटत असेल तर त्यांनी त्यांच्या पक्षाचे नांव देखील "औरंगजेब राष्ट्रवादी पक्ष" असे करून घ्यावे असा सल्ला भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी दिला आहे.

# गुलाबराव इंगळे, अमोल गावंडे, सागर झनके यांना पुरस्कार जाहीर







आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** महाराष्ट्र राज्य पत्रकारा संघ मुंबई आणि दैनिक मराठवाडा साथीच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून पत्रकारितेमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांना पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियानी राज्यस्तरीय पुरस्कार दिल्य जातो. त्यासाठी निवड समितीकडे मोठ्या प्रमाणावर पुरस्कारासाठी प्रवेशीका आल्या होत्या. निवड समितीद्वारा आलेल्या साहित्याचे परिक्षण करून पुरस्कार प्राप्त विजेत्यांची नावे जाहीर केली.

पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियांनी राज्यस्तरीय पुरस्कारासाठी अमरावती विभागातून गुलाबराव इंगळे,दै.सकाळ जळगाव जामोद तालुका प्रतीनीधी, अमोल गावंडे,निर्भिड स्वराज संपादक, खामगाव तर सागर झनके आधुनिक केसरी बुलढाणा जिल्हा प्रतीनीधी यांची निवड करण्यात आली आहे.

लवकरच मान्यवरांच्या हस्ते औरंगाबाद येथे पुरस्काराचे वितरण केल्या जाईल, अशी माहिती राज्य पत्रकार संघाचे प्रदेशअध्यक्ष वसंत मुंडे व दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक दुलाल बियांनी यांनी दिली.

# राष्ट्रीय नाभिक एकता महासंघ व महाराष्ट्र नाभिक आरक्षण समिती 'एक साथ'

## समाज हितासाठी नाभिक संघटना एका विचाराने सोबत

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** महाराष्ट्रतील नाभिक समाजातील महत्वाच्या विविध संघटना पदाधिकार्यांची बैठक सातपुर नाशिक येथे १४ फेब्रुवारी रोजी पार पडली यात राष्ट्रीय नाभिक एकता महासंघ व महाराष्ट्र नाभिक आरक्षण समिती ' एक साथ ' राहत समाज हितासाठी दोन्ही नाभिक संघटना एका विचाराने सोबत राहुन नेता हितापेक्षा समाज हित महत्वाचे अशा सुर बैठकीत निघाल्याने सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

महाराष्ट्रतील नाभिक समाजातील महत्वाच्या विविध संघटना पदाधिकार्यांची बैठक सातपुर नाशिक येथे १४ फेब्रुवारी रोजी पार पडली यात राष्ट्रीय नाभिक एकता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष भगवान आण्णा बिडवे व महाराष्ट्र नाभिक आरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवदास फुळवळकर सर व राष्ट्रीय अध्यक्ष किशोर गाडेकर (बीड) उपाध्यक्ष दादासाहेब काळे (औरंगाबाद) सचिव हरिष राऊत ( ठाणे ) सचिन चित्ते (मालेगाव) माजी अध्यक्ष धनराज सोनवणे (धुळे) प्रसाद गड्डीनकर (पुसद) अंजली प्रधान (नाशिक) नितीन क्षिरसागर (बीड) यांच्या सह अनेक पदाधिकाऱ्याच्या उपस्थितीत नाभिक समाजातर्फे नाशिक गोदावरी घाटावर भव्य दिव्य संतपिठ निर्माण कार्यात व इतर समाज हिताच्या कामासाठी दोन्ही संघटना स्वतःहाचे अस्तिव अबादित ठेवून सोबत काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. समाज एकता अभियान हे समाजातील सर्व घटकांना एकत्र करून सामाजिक समस्या एकीकरणाने सोडविण्यासाठी कोणत्याही राजकीय सामाजिक नेत्यांच्या दबावाखाली न येता आपण आपला स्वाभिमान कायम ठेवण्यासाठी निर्माण झाला आहे. सामाजिक ऐक्या शिवाय कोणतेही ऐक्य, न्याय वा



सामाजिक विकास शक्य नाही. संविधानाने दिलेले हक्क अधिकारही आज समाजाला मिळताना दिसत नाही. समाजात जाऊन वैयक्तिक, राजकीय मतभेद बाजूला सारून सामाजिक उत्थानासाठी एक झालो तर एकीकरणाचे फळ सर्वांना चाखता येतील. कोणत्याही राजकीय सामाजिक नेत्यांना डोक्यावर न घेता अथवा कोणत्याही राजकीय नेत्यांना विरोध न करता व कोणत्याही पक्षाची, नेत्याची वैयक्तिक जाहिरात न करता समाजामध्ये प्रबोधन करून समाज ऐक्यासाठी समाज एकता अभियाना मध्ये सहभागी होऊन सामाजिक कार्यास इतर सामजिक नाभिक संघटना प्रमुखानी कोणत्याही नेत्याचे गुणगान न गाता कोणत्याही आर्थिक मिळकतीची अपेक्षा न करता, कोणत्याही पदाची अपेक्षा न करता केवळ निस्वार्थ भावनेतून समाज एक करण्यासाठी इच्छुकांनी सहभागी व्हायचे आवाहान भगवान बिडवे, शिवदास फुलवळक , दादासाहेब काळे किशोर गाडेकर यांनी केले आहे.




# दैनिक अट्टल संकेतचे शानदार सोहळ्यात प्रकाशन

## संपादक रशपालसिंघ अटल यांच्याकडून मान्यवर संपादक-पत्रकारांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दैनिक अट्टल संकेत दैनिकाचा शुभारंभ गुरुवारी एका शानदार सोहळ्यामध्ये पार पडला. या प्रकाशन सोहळ्यात उपस्थित पत्रकार, संपादकांचा अटल संख्येचे संपादक राजपाल सिंग यांच्याकडून शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सभागृहात झालेल्या या प्रकाशन सोहळ्याचे, अध्यक्ष सेवा निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी एस.के.बावस्कर यांनी भूषवले. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचे हस्ते दैनिक अट्टल संकेतचे प्रकाशन थाटात करण्यात आले. संपादक रशपालसिंग अटल यांनी प्रास्ताविक केले. हितचिंतक व मित्रांच्या पाठिंबामुळे मी दैनिक सुरू करण्याचे धाडस केले आहे. असे प्रतिपादन रशपालसिंघ अटल यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार स. सो खंडाळकर यांनी प्रमुख अतिथी म्हणून शुभेच्छा देणारे भाषण केले. ते म्हणाले की अटल संकेत हे या दैनिकाचे नावच उभारी देणारे आहे. हे दैनिक भ्रष्ट नाठाळ प्रवृत्तीवर प्रहार करत राहील अशी अपेक्षा खंडाळकर यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे म्हणाले की, दैनिक अट्टल संकेत हे वृत्तपत्र कष्टकरी सामान्य जनतेला न्याय देत राहील.

हे दैनिक वाड्या दांड्यावर पोहोचेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष, रतन कुमार साळवे यांनी सांगितले की, पंजाब प्रांतातील असतानाही त्यांनी मराठी भाषेतील वृत्तपत्र यशस्वी केले ही अभिमानाची बाब आहे. त्यांची ही वाटचाल वरचेवर यशस्वी होत आहे. हे सत्य इतर पत्रकारांनी ही लक्षात घेतले पाहिजे. प्रा. डॉ. प्रभू गोरे यांनीही संपादक रशपालसिंघ अटल यांच्यावर भाष्य केले. ते म्हणाले, श्री अटल हे पंजाबी असले तरी ते पंजाबी वाटत नाहीत इतके मराठी पत्रकारांमध्ये ते समरस झालेले आहेत. एस.के बावस्कर यांनीही यशस्वी होण्याचे सूत्र सांगितले. समाजभिमुख पत्रकारितेवर भर दिला पाहिजे असे आव्हान बावस्कर यांनी केले. प्रा. अंकुश शिंदे कवी भीमराव गाडेकर यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रतनकुमार साळवे यांनी केले तर आभार प्रदर्शन विलास ढवळे यांनी केले. पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांनीही प्रकाशन सोहळ्यात शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास भास्कर रेगे,कल्याण देहाडे,संजय सोनखेडे, अँड.अशोक राठोड बाजीराव सोनवणे, महेश मुरकुटे,जगन्नाथ सुपेकर, पंडित चव्हाण, शेख शफीक, संजय व्यापारी,विक्रम राठोड, भाऊसाहेब शेजुळ,फिरोज खान,राजाभाऊ उघडे, सुजित ताजने , कवल बिंद्रा, बबन सोनवणे, प्रल्हाद गवळी, आदी पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पहूर येथे महाशिवरात्रीनिमित्त भरणार भव्य यात्रोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रोत्सव करणार असून तयारी अंतिम टप्प्यात आली आहे .

पहूर शेंदुर्णी मार्गावर पहूर पासून दोन किलोमीटर अंतरावर श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर असून येथे भाविकांची मोठी गर्दी असते . गेल्या १७ वर्षांपासून येथे मंदिराचे पुजारी व ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांच्या अथक परिश्रमातून भाविकांच्या अमूल्य सहकार्याने शिव महापुराण व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह यात्रोत्सव भरत असून यंदा प्रथमच यात्रेला व्यापक स्वरूप देण्यात येत आहे .

अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह १४ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे . शनिवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या शुभ-पर्वावर भव्य यात्रोत्सव होणार आहे . खेळणे - पाळण्यासह विविध व्यावसायिकांनी आपले स्टॉल्स लावण्यासाठी ट्रस्टशी संपर्क साधण्याचे आवाहन शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी केले आहे .

१४ रोजी ह .भ .प .शांताराम महाराज ,शेंदुर्णी , १५ रोजी ह .भ . प .बाबुराव महाराज पहूर , १६ रोजी ह .भ .प . भागवत महाराज , शेंदुर्णी यांचे कीर्तन झाले तर १७ रोजी ह .भ . प .प्रा. योगिता महाराज , शेंदुर्णी , १८ रोजी ह . भ .प . विष्णुदास महाराज , चिंचखेडा, १९ रोजी ह .भ. प . फकीरा , महाराज , जामनेर , २० रोजी ह . भ .प . रमेश महाराज लोंढरी यांचे दररोज रात्री साडेआठ वाजता किर्तन होणार असून २१ रोजी सकाळी ९ - ३० वा ह.भ .प. काशिनाथ महाराज तोंडापूर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराच्या पावन परिसरात दररोज १४ ते २० फेब्रुवारी दरम्यान दुपारी १ ते सायंकाळी पाच वाजे दरम्यान शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून हरिभक्त परायण रमेश महाराज कथेचे प्रवक्ते आहेत. शनिवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या शुभपर्वावर होणाऱ्या भव्य यात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून ग्रामपंचायत पहूर कसबे , ग्रामपंचायत पहूर पेठ ,पोलीस प्रशासन , विविध शाळा , पत्रकार संघटना तरुण मंडळ , महिला मंडळाचे सहकार्य लाभत आहे . पहूरच्या सांस्कृतिक वैभवात सदर यात्रेमुळे भर पडणार असून संगमेश्वराची यात्रा पहूर गावाची परंपरा होईल असे पूजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी पत्रकार परिषदेत सांगितले .

यात्रोत्सवात सर्व भाविकांनी पंचक्रोशीतील नागरिकांनी सहभागी व्हावे आणि शांततेत यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे .



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद